नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १६२ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com


AROTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
रूट कॅनॉल ट्रीटमेंट
हिरडयांवरील उपचार व शस्त्रक्रिया
वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
दात व जबडयांवरील शस्त्रक्रिया
कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

शनिवार, दि. १६ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

# मास्टरमाईंड 'ला पुण्यातून अटक

## नीट पेपरफुटी प्रकरण : रसायनशास्त्राच्या सेवानिवृत्त प्राध्यापकाला सीबीआयने ठोकल्या बेड्या



मुंबई : (स. गांवकरी)

नीट-यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने मोठी कारवाई केली आहे. पेपरफुटी प्रकरणी पुण्यातून रसायनशास्त्राच्या सेवानिवृत्त प्राध्यापकाला अटक करण्यात आली आहे. पी. व्ही कुलकर्णी असे या सेवानिवृत्त प्राध्यापकाचे नाव असून, तो नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या वतीने परीक्षा प्रक्रियेत सहभागी होता आणि त्याच्याकडे प्रश्नपत्रिकाही उपलब्ध होत्या, अशी माहिती समोर आली आहे. नीट पेपरफुटी प्रकरणाचा तोच मास्टरमाईंड असल्याचे सीबीआयच्या तपासात आढळून आले आहे. याबाबत इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, नीट पेपरफुटी प्रकरणी सीबीआयने पी. व्ही. कुलकर्णी या सेवानिवृत्त प्राध्यापकाला पुण्यातून अटक केली आहे. पेपरफुटीचा तोच मास्टरमाईंड असल्याचे तपासात समोर आले आहे. कुलकर्णी एनटीएच्या वतीने परीक्षेच्या प्रक्रियेत सहभागी होता. त्याच्याकडे प्रश्नपत्रिका उपलब्ध होत्या एवढेच नव्हे तर एप्रिल २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात पुण्यातील निवासस्थानी विशेष कोचिंग सत्रे आयोजित केली होती. या सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना फुटलेल्या पेपरवरुनच शिकवणी देण्यात आली होती. दरम्यान, आता सीबीआयने प्रश्नपत्रिका तयार करण्याच्या प्रक्रियेत सहभागी असलेल्या लोकांची यादी शिक्षण मंत्रालयाकडे मागितली आहे. सीबीआयने चौकशीनंतर प्राध्यापक कुलकर्णीला पुण्यात अटक करून दिल्लीला नेण्यात आले आहे. कुलकर्णीने घेतलेल्या विशेष कोचिंग क्लासमध्ये सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी कथितरित्या लाखो रुपये फी जमा केली होती. दरम्यान, सीबीआयने मनीषा वाघमारेसह आणखी एका व्यक्तीला पुण्यातून अटक केली आहे.

### वाघमारे आणि लोखंडे यांना अटक

दरम्यान, 'नीट' प्रश्नपत्रिका फुटल्याच्या प्रकरणात पुण्यातील ब्यूटीपार्लर चालविणारी महिला मनीषा वाघमारे आणि अहिल्यानगर येथील धनंजय लोखंडे यांना केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) गुरुवारी रात्री उशिरा अटक केली. धनंजय लोखंडे (वय २६) याला ताब्यात घेतल्यानंतर त्याच्या संपर्कातील पुण्यातील लागेबांधे समोर आले होते. त्यानुसार, बिबवेवाडी परिसरात ब्यूटीपार्लर चालविणारी मनीषा वाघमारे आणि अभियांत्रिकी शाखेत शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थ्याला पुणे पोलिसांनी बुधवारी (१३ मे) ताब्यात घेतले होते. त्यानंतर दोघांनाही पुढील चौकशीसाठी सीबीआयच्या ताब्यात देण्यात आले. तर, अभियांत्रिकी शाखेतील एका विद्यार्थ्याला चौकशीनंतर सोडून देण्यात आले आहे.

### शिवराज माटेगांवकर यांची चौकशी

या पेपरफुटीच्या प्रकरणात सीबीआयने गुरुवारी शिवराज माटेगांवकर यांची तब्बल ११ तास कसून चौकशी केली. लातूर येथील माटेगांवर आरसीसी कोचिंग क्लासेसच्या महाराष्ट्रात सर्वत्र शाखा आहेत. वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक कोचिंग क्लासेस ते घेतात. या क्लासेसमार्फत जी मॉक टेस्ट (सराव चाचणी) घेण्यात आली, त्या सराव चाचणीच्या प्रश्नपत्रिकेत नीट परीक्षेत आलेल्या प्रश्नांचा देखील समावेश होता, असे समोर आले आहे. यानंतर माटेगांवकर यांची चौकशी करण्यात आली.

# नीटमुळे टीईटीच्या तारखेत बदल

## २१ जूनऐवजी २८ जून रोजी होणार परीक्षा

मुंबई : (स. गांवकरी)



पेपर फुटीच्या प्रकरणामुळे रद्द करण्यात आलेली नीट परीक्षा २१ जून रोजी घेण्याचे राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडून (एनटीए) जाहीर करण्यात आले. त्यामुळे २१ जून रोजी होणारी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे घेण्यात आला आहे. ही परीक्षा २१ जूनऐवजी २८ जून रोजी घेण्यात येणार आहे. राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी या संदर्भात पत्रक प्रसिद्ध केले आहे. नव्याने शिक्षक होऊ इच्छिणाऱ्या सर्व उमेदवारांना टीईटी परीक्षा बंधनकारक करण्यात आली आहे. त्यामुळे टीईटी परीक्षेसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. ही परीक्षा २१ जून रोजी घेण्यात येणार होती. मात्र वैद्यकीय अभ्यासक्रमासाठी महत्त्वाची असलेली नीट यूजीचा ३ मे रोजी झालेला पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करण्यात आली. पेपर फुटल्यामुळे एनटीएने नीट परीक्षा २१ जून रोजी पुन्हा नव्याने घेणार असल्याचे शुक्रवारी सकाळी जाहीर केले. देशभरातून जवळपास २२ लाख विद्यार्थी

या परीक्षेला बसतात. ही परीक्षा देशातील विविध परीक्षा केंद्रांवर घेण्यात येते. नीट व टीईटी या दोन्ही परीक्षांसाठी राज्यातील अनेक केंद्र सारखेच आहेत. त्यामुळे टीईटी परीक्षा सुरळीत पार पडावी व विद्यार्थी हित लक्षात घेता राज्य परीक्षा परिषदेने टीईटी परीक्षापुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

असे आहे परीक्षेचे वेळापत्रक राज्य परीक्षा परिषदेने टीईटी परीक्षा २१ जूनऐवजी २८ जून रोजी घेण्यात येणार आहे. टीईटीसाठी अर्ज भरलेल्या उमेदवारांना १६ ते २८ जून या कालावधीत प्रवेश पत्राची प्रिंटआऊट काढून घेता येईल. टीईटी परीक्षा पेपर १ २८ जून रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १ या वेळेत होणार आहे. त्याचप्रमाणे टीईटी परीक्षा पेपर २ दोन दुपारी २.३० ते सायंकाळी ५ वाजता या कालावधीत होणार आहे. राज्य परीक्षा परिषदेने काही कारणास्तव परीक्षेच्या तारखा बदल केला असला तरी यापुढील काळात काही प्रशासकीय अडचणीमुळे या वेळापत्रकामध्ये सुद्धा बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे परीक्षेसंदर्भातील अद्ययावत माहिती परीक्षा परिषदेच्या https://mahatet.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी, असेही परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात...

### राष्ट्रवादी-भाजपमधील धुसफूस अखेर उघड

अहिल्यानगर (स. गांवकरी) : महापालिकेत प्रचंड बहुमत असलेल्या सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) व भाजप यांच्या नगरसेवकांतील समन्वयाला तडा गेल्याचे आज, शुक्रवारी उघड झाले. तब्बल ४८ कोटी रुपयांचे भूसंपादन व पाच व्यापारी संकुलासह भुयारी गटार योजनेसाठी ६०० कोटींचे कर्ज घेण्याच्या प्रस्तावावर विश्वासात न घेतल्याने भाजपने आज आयोजित केलेल्या सभेवर अघोषित बहिष्कार टाकला. राष्ट्रवादीमधील काहींनी त्याला साथ दिली. अखेर दोन्ही पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांनी एकमेकांशी संपर्क केल्यानंतर पुरेसे संख्याबळ नसल्याचे कारण देत महापौर ज्योती गाडे यांनी ऐनवेळी सभा तहकूब केल्याचे जाहीर केले.

### आता मराठीत निकाल बंधनकारक

मुंबई (स. गांवकरी) : राज्यभरातील महसूल अधिकारी आणि प्राधिकरणांकडे दाखल होणारी अर्धन्यायीक प्रकरणे आता अधिक वेगाने निकाली काढण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवीन 'मानक कार्यपध्दती' (एसओपी) निश्चित करून तिची अंमलबजावणी आजपासून लागू केली आहे. या संदर्भातील शासन आदेश आज काढण्यात आला असून, यापुढे महसूल विभागातील सर्व अर्धन्यायिक कामकाजात मराठी भाषेचा वापर तसेच निकालपत्रे मराठी भाषेतून बंधनकारक करण्यात आले आहेत. शासन तसेच महसूल अधिकारी, प्राधिकाऱ्यांकडे दाखल होणारे अर्धन्यायिक प्रकरणे हाताळण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून, २९ पानांच्या शासन आदेशातून यापुढेची वाटचाल निश्चित आली आहे. नवीन कार्यपध्दतीनुसार आता सुनावणीची प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य केला आहे.

### असा मुख्यमंत्री, असे पोलिस पाहिले नाहीत

मुंबई (स. गांवकरी) : कोकणातील नुकसानग्रस्त आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत देण्याच्या मागणीसाठी मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर आयोजित केलेला सर्वपक्षीय मोर्चा आंदोलकांची धरपकड, अडवणूक करून सरकारने हाणून पाडला. राजू शेट्टींसह काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन संपकाळ, शिवसेना नेते विनायक राऊत, अरविंद सावंत, राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर, मराठी भाषा समितीचे दीपक पवार, प्रकाश रेड्डी यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांना पोलिसांनी मोर्चा स्थळी जाण्यापूर्वीच ताब्यात घेतल्यामुळे नियोजित मोर्चा निघू शकला नाही.

# यंदा केरळमध्ये २६ मे रोजी मोसमी पाऊस दाखल होणार

मुंबई : (स. गांवकरी)



यंदा मोसमी पाऊस वेळेपूर्वी दाखल होण्याचा अंदाज असून दक्षिण बंगालच्या उपसागरात मोसमी पावसासाठी अनुकूल स्थिती आहे. अंदमान समुद्र तसेच अंदमान आणि निकोबार बेटांवर शनिवारी पाऊस दाखल होईल, असा अंदाज भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तविला आहे. तसेच शुक्रवारी हवामान विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या हवामानाच्या अंदाजानुसार, केरळ येथे मोसमी पावसाचे आगमन २६ मे रोजी होईल, अशी शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे यंदा वेळेपूर्वी पाऊस हजेरी लावणार असून त्यामुळे नागरिकांना तीव्र उन्हापासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

राज्यात सध्या काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम आहे तर काही जिल्ह्यांत वादळी पावसाची नोंद होत आहे. दरम्यान, शुक्रवारी मध्य महाराष्ट्रातील जळगाव तसेच मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती नोंदली गेली. त्यामुळे नागरिकांना सध्या तीव्र उन्हाचा सामना करावा लागत आहे. विदर्भातही सरासरीहून २ ते ३ अंश कमाल तापमानाची अधिक नोंद होत आहे. दरम्यान, शुक्रवारी विदर्भातील अकोला येथे ४५. ४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर वर्धा ४५.५, अमरावती ४५.६, नागपूर ४५ तर चंद्रपूर येथे ४३.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. या प्रदेशात किमान तापमानातही मागील काही दिवसांपासून वाढ नोंदली जात असून त्यामुळे नागरिकांना रात्रीच्या वेळीही उकाड्याला तोंड द्यावे लागत आहे.

मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यातही मागील काही दिवसांपासून कमाल तापमानात वाढ नोंदली जात होती शुक्रवारी मागील काही दिवसांच्या तुलनेत काही ठिकाणी १ ते २ अंशांची घट नोंदली गेली. दरम्यान, शुक्रवारी जळगाव येथे ४२.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर पुणे ३६.२, सातारा, ३६.७, अहिल्यानगर ३९ आणि नाशिक येथे ३५.८ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. तर शनिवारी या प्रदेशातील बहुतांश भागात हवामान कोरडे राहणार असून काही भागात पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. मराठवाड्यात काही जिल्ह्यात उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम आहे. दरम्यान, पुढील चार दिवसात राज्यातील कमाल तापमानात १ ते २ अंश सेल्सिअसने वाढ होईल, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

# वकिली अनुभवाची अट पूर्वलक्ष्यी प्रभावाने का ?

मुंबई : (स. गांवकरी)



दिवाणी न्यायाधीश आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी परीक्षेसाठी तीन वर्षांच्या वकिली अनुभवाची अट अनिवार्य करण्यात आली आहे. मात्र, ही अट पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू करण्याला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्याची दखल घेऊन न्यायालयानेही राज्य सरकार आणि महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाला (एमपीएससीला नोटीस बजावून याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले. दोन विधि पदवीधर आणि प्रत्यक्ष वकिली करणाऱ्या अधिवक्त्यांनी या प्रकरणी याचिका केली आहे. मुख्य न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने त्यावर सुनावणी घेताना उपरोक्त आदेश दिले. या याचिकेद्वारे, दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ विभाग) आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या २८६ पदांच्या भरतीसाठी एमपीएससीने ३० एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिरात क्रमांक ०१३/२०२६ ला आव्हान देण्यात आले आहे. या जाहिरातीनुसार, या परीक्षेत सहभागी होण्यासाठी पात्रता अट म्हणून, वकिली व्यवसायाचा तीन वर्षांचा अनुभव अनिवार्य करण्यात आला आहे. तथापि, संबंधित जाहिरात ही २० मे २०२५ रोजी "ऑल इंडिया जजेस असोसिएशन विरुद्ध भारत सरकार" या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या विसंगत आहे, असा दावा याचिरकाकर्त्यांनी केला आहे.



# प्रेयसीने पती आणि भावाच्या मदतीने केला प्रियकराचा खून

## मृतदेह ड्रममध्ये कोंबून नाल्यात फेकला, असा उघडकीस आला कट

मुंबई : (स. गांवकरी)

मुंबईजवळील मुंब्रा येथे एक थरारक खून प्रकरण उघडकीस आले आहे. एका महिलेने तिचा नवरा आणि भावाच्या मदतीने आपल्याच प्रियकराची हत्या केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. संशयितांनी पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह एका गटारातील हिरव्या ड्रममध्ये कोंबून फेकून दिला होता. याप्रकरणी मुंब्रा पोलिसांनी मेहजबीन शेख आणि तिच्या भावाला अटक केली असून, तिचा पती आणि आणखी एक आरोपी फरार आहे.

अरबाज मकसूद अली खान असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अरबाज ३ एप्रिल २०२६ रोजी कामासाठी दादरला जात असल्याचे सांगून घरातून बाहेर पडला. मात्र, घरी न परतल्याने त्याच्या कुटुंबीयांनी मुंब्रा पोलिसांनी अरबाज बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली. तपासात पोलिसांनी अरबाजच्या कॉल रेकॉर्ड्स आणि मोबाईल लोकेशन हिस्ट्रीची तपासली. अरबाजच्या फोनचे शेवटचे लोकशेन वर्सोवा परिसरात होते. अरबाजची प्रेयसी, मेहजबीन शेख याच परिसरात राहत असल्याचे पोलिस तपासात समोर आले. प्राथमिक संशयातून पोलिसांनी मेहजबीनला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातीला मेहजबीनला पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. पण, कसून चौकशी केली असता मेहजबीनने गुन्हा कबूल केला आणि संपूर्ण कटाची माहिती दिली. मेहजबीनने तिचा पती हसन आणि तिचा भाऊ तारिक शेख यांनी अरबाजकडून पैसे उकळण्याचा कट रचला होता. पण, प्लॅन फसल्याने त्यांच्यात वाद झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयितांनी अरबाजला बांधून प्लास्टिकच्या पाईपने निर्घृण मारहाण केली व नंतर हत्या केली.

### मृतदेह ड्रममध्ये कोंबला

अरबाजची हत्या केल्यानंतर संशयितांनी त्याचा एका हिरव्या रंगाच्या ड्रममध्ये कोंबला आणि पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने ड्रम मुंब्रा भागातील एका निर्जन नाल्यात फेकून दिला. पोलिसांनी सध्या मेहजबीन शेख आणि तिचा भाऊ तारिक शेख यांना अटक केली आहे. तर, मेहजबीनचा पती हसन आणि मुजम्मल पठाण नावाचा दुसरा आरोपी सध्या फरार आहेत. मुंब्रा पोलिस अधिक तपास करत आहेत.

# विद्यापीठे, महाविद्यालयांना इंधन बचतीच्या सूचना

मुंबई : (स. गांवकरी)




इंधन बचत, सार्वजनिक वाहतुकीचा वापर, स्वदेशी वस्तूंना प्राधान्य आणि परदेश दौऱ्यांवर मर्यादा आता उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांवरही घालण्यात आल्या आहेत. पंतप्रधान नरेंद्र नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने केलेल्या आवाहनानुसार देशाची आर्थिक स्थिती अधिक बळकट करण्यासाठी आणि विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी इंधन बचतीपासून जीवनशैलीतील बदल करण्याच्या सूचना विभागाकडून देण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्र्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करण्यास सुरुवात केल्यानंतर उच्च शिक्षण विभागाने सर्व विभागीय सहसंचालक आणि राज्य सार्वजिनक विद्यापीठांच्या कुलसचिवांना दैनंदिन पद्धतीत बदल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. इंधन बचत आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी शक्य असेल तेथे खाजगी वाहनांचा वापर टाळून मेट्रो रेल्वे आणि इतर सार्वजनिक वाहतूक साधनांचा वापर करावा. पेट्रोल आणि डिझेलचा मर्यादित वापर करणे, त्यासाठी कारपूलिंग सारख्या संकल्पनांनाही प्रोत्साहन द्यावे, ऊर्जेची बचत वाढविणे आणि यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक असल्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. संस्थांमधील सदस्यांनी आवश्यक व अपरिहार्य असल्यासच परदेश दौरे करावेत. महत्त्वाच्या किंवा अतिमहत्त्वाच्या बैठकांव्यतिरिक्त इतर बैठका प्रत्यक्ष उपस्थित राहून घेण्याऐवजी ऑनलाइन माध्यमातून आणि व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



लिंगदेव विविध का.सेवा सो. लिंगदेव
ता.अकोले, जि. अहिल्यानगर
मार्गदर्शक : मा. सिताराम पा. गायकर (सहकार महर्षी)
चेअरमन : मा. सुनिल ज्ञानदेव चौधरी
व्हा. चेअरमन : मा. मारुती बोराडे
सचिव : मा. संदिप आरोटे
सन्मा. संचालक मंडळ, सभासद वृंद, सर्व कर्मचारी वृंद

# थोडक्यात पण महत्वाचे





## दहावी निकालात कन्या विद्यालय तालुक्यात अव्वल

श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : नुकत्याच जाहीर झालेल्या इयत्ता दहावीच्या निकालात श्रीगोंदा येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने आपल्या गुणवत्तेची परंपरा कायम राखत तालुक्यात अव्वल स्थान पटकावले आहे. तालुक्यातील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थिनी याच विद्यालयातील असल्याने विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यालयातील कु. पूर्वा युवराज रणसिंग हिने 98.20 टक्के गुण मिळवत विद्यालयासह तालुक्यात प्रथम येण्याचा मान पटकावला. तर कु. ज्ञानदा लक्ष्मण शेंडे हिने 97.60 टक्के गुण मिळवत तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळवला. कु. संस्कृती नंदकुमार गायकवाड हिने 97.00 टक्के गुणांसह तालुक्यात तृतीय क्रमांक मिळवला. याशिवाय कु. प्रणाली परसराम लांडगे व कु. अनुष्का पंकज कदम यांनी प्रत्येकी 96.60 टक्के, तर कु. अस्मिता अशोक टकले हिने 96.00 टक्के गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थिनींमध्ये स्थान मिळवले. यावर्षी विद्यालयातून एकूण 243 विद्यार्थिनी परीक्षेस प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी 239 विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून विद्यालयाचा निकाल 98.35 टक्के लागला आहे. यामध्ये 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणाऱ्या 9 विद्यार्थिनी, 90 ते 94 टक्के गुण मिळविणाऱ्या 24 विद्यार्थिनी तसेच 80 ते 89 टक्के गुण मिळविणाऱ्या 62 विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थिनी व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा भोईटे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे, गुरुकुल प्रमुख श्री. किरण शिंदे, इयत्ता दहावीचे सर्व वर्गशिक्षक, सेवकवृंद तसेच संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य श्री. बाबासाहेब भोस, माजी आमदार राहुलदादा जगताप, जनरल बॉडी सदस्य श्री. कुंडलिकराव दरेकर, लाईफ वर्कर्स, लाईफ मेंबर्स, स्थानिक स्कूल कमिटी, शाळा व्यवस्थापन समिती, शाळा विकास समिती, विद्या समिती, पालक-शिक्षक संघ, सल्लागार समिती, माता पालक समिती सदस्य तसेच पंचक्रोशीतील नागरिकांनी अभिनंदन केले.

## जनगणना प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

श्रीगोंदा (स. गांवकरी) : जनगणना 2027 अंतर्गत पहिल्या टप्प्यातील घरगणना कामकाजासाठी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण शिबिर श्रीगोंद्यातील महाराजा जीवाजीराव शिंदे महाविद्यालयात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. 23 एप्रिल ते 8 मे या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागासाठी नियुक्त 597 प्रगणक व पर्यवेक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात 510 प्रगणक व 87 पर्यवेक्षकांनी सक्रिय सहभाग नोंदविला. 16 मे ते 14 जून दरम्यान होणाऱ्या जनगणना घरगणना प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर चार बॅचमध्ये प्रत्येकी सुमारे 150 प्रशिक्षणार्थींना 12 दिवसीय सखोल प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षण शिबिरास तहसिलदार तथा उपविभागीय चार्ज अधिकारी श्रीगोंदा-पारनेर मा. सचिन डोंगरे, उपजिल्हाधिकारी मा. विनीत शिर्के तसेच मा. कुमार चिंचकर यांनी भेट देत प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. जनगणना प्रक्रियेतील अचूकता, जबाबदारी आणि नागरिकांशी समन्वय याबाबत त्यांनी महत्त्वपूर्ण सूचना केल्या. या शिबिरात उत्तरेश्वर मोहळकर, राजेंद्र येवले, राजेंद्र ठुबे, प्रवीण तांबे, राजेंद्र पवार, शिवलिंग गेरंगे, हरिभाऊ वाघीरे आणि प्रदीप उंडे यांनी फील्ड ट्रेनर म्हणून काम पाहत जनगणना प्रक्रियेचे प्रात्यक्षिकांसह सखोल प्रशिक्षण दिले. शिबिरादरम्यान श्रीगोंदा नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी पुष्पगंधा भगत, गटविकास अधिकारी राणी फराटे तसेच गटशिक्षणाधिकारी कुसुमकुमारी कानडी यांनी सदिच्छा भेट देऊन प्रशिक्षणार्थींना शुभेच्छा दिल्या. मा. तहसिलदार सचिन डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली जनगणना सहाय्यक चार्ज अधिकारी संतोष झाडे, अतिरिक्त चार्ज अधिकारी तथा निवासी नायब तहसिलदार मिलिंद जाधव आणि जनगणना सहाय्यक प्रकल्प अधिकारी किशोर किसवे यांनी संपूर्ण प्रशिक्षणाचे नियोजन यशस्वीपणे पार पाडले.



## शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलच्या खेळाडूचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

श्रीगोंदा (स. गांवकरी) : शिवाजीराव नागवडे डॅफोडील्स स्कूलचा खेळाडू यश राजेंद्र खाकाळ याने पुणे येथे आयोजित राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्यपदक पटकावले आहे. ८ ते १० एप्रिल दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस मिलिटरी स्कूल, फुलगाव (पुणे) येथे झालेल्या राज्यस्तरीय किक बॉक्सिंग स्पर्धेमध्ये यशने १३ ते १५ वयोगटातील ४७ किलो वजन गटात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत रौप्यपदक मिळविले. या यशाच्या जोरावर त्याची १७ ते २१ जून २०२६ दरम्यान इंदोर, मध्यप्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय किक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. यश खाकाळच्या या यशाबद्दल त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, शाळा, पालक व प्रशिक्षकांनी त्याचे कौतुक केले आहे.

## सोनावळे आश्रमशाळेचा विद्यार्थी संजय गवारी प्रकल्पात दुसरा



जुन्नर तालुका (स. गांवकरी) : शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा सोनावळे ता:-जुन्नर जि.पुणे या शाळेचा एच.एस. सी फेब्रुवारी २०२६(बारावी)चा निकाल ९५: ९४% तर एस.एस. सी मार्च २६ (दहावी ) चा निकाल ९६.२९% लागला,शाळेची उत्कृष्ट निकालां ची परंपरा याही वर्षी कायम राहिली.अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मंगल गुंड यांनी दिली. शासकीय आश्रमशाळा सोनावळे या शाळेचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी संजय लक्ष्मण गवारी याने ८७ टक्के मार्क मिळवून शाळेत प्रथम तर घोडेगाव प्रकल्पात अनुसूचित जमाती प्रवर्गातून दुसरा आला. तसेच गणित यासारख्या अवघड विषयांमध्ये १०० पैकी ९८ गुण मिळवून हा विद्यार्थी आदिवासी विकास विभाग ठाणे विभागात गणित विषयात प्रथम आला त्याने दहावी परीक्षेत केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल व मिळवलेल्या यशाबद्दल त्याचे व शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे. सोनावळे गावचे सरपंच सुखदेव रावते यांनीही संजय गवारी यास त्याच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पंधरा हजार रुपयांचे रोख स्वरूपाचे पारितोषिक घोषित केले आहे. तसेच इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे व शाळेतील सर्व कर्मचाऱ्यांचेही त्यांनी कौतुक केले.

# नगर शहरात भोंदूबाबाला अटक

### घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या नावाखाली घातला गंडा



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

नगर शहरात अंधश्रद्धेच्या नावाखाली मोठी फसवणूक उघडकीस आली आहे. घराखालील गुप्तधन काढून देण्याच्या आमिषाने एका भोंदूबाबाने महिलेकडून ५० हजार रुपये घेवून जादूटोणा, अघोरी विद्या केल्याचे दाखवत गुप्तधनही काढून दिले नाही आणि घेतलेले पैसेही परत न देता फसवणूक केली आहे. या प्रकरणी १२ मे रोजी रात्री उशिरा तोफखाना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्या भोंदू बाबाला पोलिसांनी अटक केली आहे. शिव अण्णासाहेब सोनवणे (रा.रंगभवन जवळ, सर्जेपुरा) असे या भोंदूबाबाचे नाव आहे. याबाबत सोनाली महेश काळोखे (रा.रंगभवन जवळ, सर्जेपुरा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांच्या घराजवळच राहणारा भोंदूबाबा शिव सोनवणे याने फिर्यादी व त्यांच्या कुटुंबाला तुमच्या घराखाली मोठ्या प्रमाणात सोन्याचे गुप्तधन आहे. ते जादूटोणा आणि अघोरी विद्या करून काढून देतो असे आमिष दाखवले. त्यासाठी त्यांच्याकडून ५० हजार रुपये रोख स्वरुपात घेतले. या भोंदूबाबाच्या भूलथापांना बळी पडून फिर्यादीच्या कुटुंबीयांनी घर पाडले. त्यानंतर या भोंदू बाबाने त्या जागेत लिंबू, मानवी कवटी, हाडे, हळद, कुंकू, भस्म अशी पूजा मांडून मोठमोठ्याने मंत्र उच्चारून अघोरी विधी केला. परंतु कुठलेही गुप्तधन मिळवून न देता आणि घेतलेले ५० हजार रुपये न देता फसवणूक केली. तसेच आता ही जागा माझी आहे. तुम्ही जर माझ्या नादाला लागले तर तुमच्यावर अघोरी प्रयोग करून तुम्हाला संपवून टाकील अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी भोंदूबाबा शिव अण्णासाहेब सोनवणे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ३१८ (४), ३५१ (२) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट प्रथा व जादूटोणा यांना प्रतिबंध व त्याचे समूळ उच्चाटन करण्याबाबत अधिनियम २०१३ चे कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक जगदीश भांबळ आणि गुन्हे शोध पथकाने भोंदूबाबा शिव सोनवणे याला रात्रीच अटक केली आहे. दरम्यान भोंदू बाबा शिव सोनवणे याने गुप्तधनाच्या आमिषाने काळोखे कुटुंबाला घर पाडायला लावले. त्यांची आर्थिक फसवणूक केली. तसेच जागा बळकावण्यासाठी कुटुंबीयांना ११ मे रोजी रात्री १०.३० च्या सुमारास लाथाबुक्क्यांनी आणि कुऱ्हाडीच्या दांड्याने बेदम मारहाणही केली आहे. या मारहाण प्रकरणी आणखी एक गुन्हा तोफखाना पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महेश भास्कर काळोखे (वय २९, रा. रंगभवन, सर्जेपुरा) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात शिव अण्णासाहेब सोनवणे, ओम अण्णासाहेब सोनवणे, कोहिनूर अण्णासाहेब सोनवणे (सर्व रा. सर्जेपुरा) आणि यश सागर सोळशे (रा. बोल्हेगाव) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिव सोनवणे आणि इतर आरोपींनी फिर्यादी महेश काळोखे यांना शिवीगाळ करत मारहाण केली. भांडण सोडवण्यासाठी आलेला भाऊ दीपक आणि आई लक्ष्मी यांनाही आरोपींनी कुऱ्हाडीच्या दांड्याने मारहाण करत जखमी केले. तसेच त्यांच्या दुचाकीचेही नुकसान करून जीवे मारण्याची धमकी दिली. या फिर्यादी वरून शिव सोनवणे सह चौघांवर मारहाणीचा व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## जमिनीवरील अतिक्रमण काढण्यास प्रशासकीय अनास्था

तामसा : (स. गांवकरी)

सहकारी चळवळीचा कणा समजल्या जाणाऱ्या तामसा येथील सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्थेचे अस्तित्व सध्या धोक्यात आले आहे. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हदगाव यांच्या अखत्यारीत असलेल्या या संस्थेच्या 3 हेक्टर 11 आर जमिनीवर बड्याबड्यांनी अतिक्रमण करून शासनाची कोट्यवधी रुपयांची मालमत्ता गिळंकृत केली आहे. विशेष म्हणजे, वारंवार तक्रारी होऊनही अवसायक आणि संबंधित विभागाकडून ठोस कारवाई करण्याऐवजी केवळ 'तारीख पे तारीख' दिली जात असल्याने प्रशासकीय अनास्था आणि प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत असून जिल्हाधिकाऱ्यांनी यात हस्तक्षेप करावा. अशी करण्याची मागणी पुढे आली आहे. एकेकाळी डौलाने चालणारी तामसा येथील सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था प्रशासकीय असहकारामुळे अवसायनात निघाली. संस्था पुनरुज्जीवित करण्याच्या नावाखाली संस्थेच्या 3 हेक्टर 11 आर जमिनीपैकी 50 गुंठ्यांत 23 प्लॉट पाडून विक्री करण्यात आली होती. मात्र, त्या विक्रीतून जमा झालेली रक्कम संस्थेच्या पदरात पडण्याऐवजी अपहार झाल्याचे सांगण्यात आले. कोट्यवधीचे प्लॉट गेले, पैसा गेला आणि उर्वरीत करोडोची जमीन अतिक्रमणधारकांच्या घश्यात गेली. मात्र संस्था पुनरुज्जीवित झाली नाही, ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. एका सहकारी संस्थेचे वाटोळे होत असतानाही अतिक्रमण काढण्यासाठी प्रशासनाची अनास्था पुढे येत आहे. जिनिंग प्रेसिंगच्या यार्डात फुटभर मोकळी जमिन शिल्लक नाही. शासकीय जागेत नियमांची पायमल्ली करीत पक्के बांधकामे झाली. सहायक निबंधकांचे 'नाहरकत' व ग्रामपंचायतीने बांधकाम परवाने मिळाले कसे? हा कळीचा मुद्दा आहे.

# रस्ता होना चाहिये मगर आंगण छोडके

खोडद : (स. गांवकरी)

ग्रामपंचायत नारायणगावने काही दिवसांपूर्वीच बस स्थानक ते पूर्व वेस या रस्त्याच्या साईटपट्ट्या दुरुस्त करून खड्डे बुजवले होते. तसेच रस्त्यात येत असलेले दुकानदारांचे ओटे काढले होते. नारायणगाव ही तालुक्यातील मुख्य व मोठी बाजारपेठ असल्यामुळे तालुक्यातील सर्व ठिकाणाहून याठिकाणी खरेदीसाठी येत असतात. व आपली वाहने दुकानासमोर लावून दुकानामध्ये खरेदी करण्यासाठी जात असतात परंतु या साईटपट्ट्याना खड्डे व अरुंद रस्ता असल्यामुळे ग्राहकांना येथे अडचण निर्माण होत होती. ग्रामपंचायतीने हा प्रश्न लक्षात घेऊन बस स्थानक ते पूर्ववेसपर्यंत च्या साईटपट्ट्याचे काम केल्यामुळे नागरिक व वाहन चालक समाधान व्यक्त करत होते. हा रस्ता रुंद झाल्यामुळे गावात येणाऱ्या वाहनांना गाड्या लावता येत होत्या.परंतु बसस्थानकाजवळील काही दुकानदार आपल्या दुकानापुढे रस्त्यालगत माती विटा दगडाचे ढीग टाकून पुन्हा रस्त्यावर येत आहेत. त्यामुळे वाहन चालकांना व नागरिकांना पुन्हा त्रास सुरू होणार आहे. ग्रामपंचायतने या दुकानदारांना किती वेळा समज द्यावी किंवा हा राडारोडा काढून टाकावा हा एक मोठा गहण प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे ज्याने त्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहन चालकांचा प्रश्न लक्षात घेऊन रस्त्यात मुरूम विटा टाकू नये. असे सुज्ञ नागरिक व वाहनचालकांचे मत आहे.सध्याची परिस्थिती व लोकांची मानसिकता अशी आहे कि रस्ता होना चाहिये मगर मेरा आंगण छोडके... अशी झाली आहे. यासंदर्भात माहिती घेतली असता बरेचशे दुकानदार म्हणाले,दुकानात येण्यासाठी ग्राहकांना पायऱ्या नसल्यामुळे अनेक दिवसांपासून दुकानांचे व्यवसाय ठप्प झाले आहेत. तसेच दुकानासमोर रस्ता खोल असल्यामुळे पायऱ्या कराव्या लागत आहेत. या पायऱ्यांचा कोणताही अडथळा आम्ही रस्त्यावरील वाहणांना किंवा नागरिकांना होऊ देणार नाही.



# पत्रकार संजय भोकरे यांच्या जीविताला गंभीर धोका




### पत्रकार संघ रावेर ची झेड प्लस' संरक्षणाची प्रशासनाला मागणी

रावेर : (स. गांवकरी)

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे खंबीर नेतृत्व श्री. संजयजी भोकरे यांच्या जीविताला सध्या गंभीर धोका निर्माण झाला असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर, भोकरे यांना तातडीने 'झेड प्लस' दर्जाचे कडक पोलीस संरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या वतीने रावेर तहसील कार्यालयात नायब तहसिलदार संजय तायडे याना गुरुवारी (१४ मे) धडक निवेदन देण्यात आले.

संजय भोकरे यांच्यावर सध्या जीवघेणा हल्ला होण्याचा कट रचला जात असल्याची भीती पत्रकार संघाने व्यक्त केली आहे. महसूल सहाय्यक, तहसील कार्यालय, रावेर यांच्याकडे सुपूर्द केलेल्या निवेदनात प्रशासनाकडे तीन प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. प्रथम, श्री. भोकरे यांच्यावर असलेला संभाव्य धोका लक्षात घेता त्यांना विनाविलंब चोख पोलीस बंदोबस्त पुरवण्यात यावा . द्वितीय, काही वर्षांपूर्वी सिद्धार्थ भोकरे यांना मिळालेल्या धमक्या आणि सध्याच्या कटाचा आपसात काही दुवा आहे का, याची सखोल गुप्तचर चौकशी करण्यात यावी. तसेच, या संपूर्ण कटाचा मुख्य सूत्रधार (मास्टरमाइंड) कोण आहे आणि पडद्यामागून हालचाली करणारे चेहरे कोणते आहेत, याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोरात कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आग्रही मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेत निर्भीडपणे काम करणाऱ्या संजय भोकरे यांच्या सुरक्षिततेबाबत गृह मंत्रालयाने तातडीने पावले उचलणे गरजेचे असल्याचे पत्रकारांनी म्हटले आहे. हे निवेदन देताना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य कार्यकारणी सदस्य व उत्तर महाराष्ट्र संघटक विनोद कोळी(शिवा भाई G), जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) सुरेश पवार, राजेंद्र सोनार (उपाअध्यक्ष), विजय अवसरमल (तालुकाअध्यक्षरावेर), विजय काशिनाथ अवसरमल, राहत खाटीक, शरीफ शेख यांच्यासह पत्रकार संघाचे अनेक पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या निवेदनाची प्रशासनाने गांभीर्याने दखल न घेतल्यास तीव्र भूमिका घेण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला आहे.

## आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी घेतली सांत्वनपर भेट

तामसा : (स. गांवकरी)

वडगांव (बु.) येथील रहिवासी आणि प्रसिद्ध शिवणकामगार संतोष राऊलवार यांचे ४ एप्रिल रोजी मोटारसायकलच्या भीषण अपघातात अकाली निधन झाले आहे. या दुर्दैवी घटनेमुळे राऊलवार कुटुंबावर कोसळलेल्या दुःखाच्या डोंगरात सहभागी होत, हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी नुकतीच त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन कुटुंबाचे सांत्वन केले. संतोष राऊलवार हे आपल्या मनमिळावू स्वभावासाठी आणि उत्कृष्ट शिवणकामासाठी तामसा परिसरात परिचित होते. ४ एप्रिल रोजी झालेल्या मोटारसायकल अपघातात त्यांना आपले प्राण गमवावे लागले. त्यांच्या निधनाने राऊलवार कुटुंबाचा मुख्य आधार हरपल्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी संतोष राऊलवार यांच्या घरी जाऊन त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी उपस्थित कुटुंबीयांशी संवाद साधला आणि त्यांना धीर दिला. संतोष राऊलवार यांच्या जाण्याने एका कष्टकरी तरुणाला आपण मुकलो आहोत. या कठीण काळात आम्ही राऊलवार कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. अशा भावना आमदार कोहळीकर यावेळी व्यक्त केल्या. यावेळी माजी उपसभापती बाबूसराव कदम रुईकर, शिवसेना समन्वयक केशवराव हरण, तामसा ग्रामपंचायत सदस्य सुभाष धरमुरे, तामसा विभागप्रमुख संतोष ठमके, शिवसेना (उबाठा)नेते अशोक फाळके, कार्यकर्ते ज्ञानेश्वर विभुते, छगन हरण, पत्रकार संजय राऊलवार , अर्जुन जोशी, शिवम राऊलवार उपस्थित होते.

# वाळू वाहतूक करणारे २ ट्रॅक्टर आणि गुरांची तस्करी करणारे वाहन जप्त

### निंभोरा पोलिसांची मोठी कारवाई




रावेर : (स. गांवकरी)

जळगाव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे (भा.पो.से.) आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. संदीप गावित यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये अवैध धंद्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवली जात आहे. या मोहिमे अंतर्गत निंभोरा पोलीस ठाण्याच्या महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख व त्यांच्या पथकाने कामगिरी करत अवैध वाळू वाहतूक आणि गुरांची तस्करी करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली आहे.

कारवाईचा तपशील:

१. अवैध वाळू (गौण खनिज) वाहतुकीवर कारवाई: दिनांक ११ मे २०२६ रोजी रात्री शासकीय वाहनाने रात्रगस्त (Division Patrolling) घालत असताना, ऐनपूर आणि विटवा गावाच्या परिसरात अवैध वाळू वाहतूक करणारे २ ट्रॅक्टर पथकाच्या निदर्शनास आले. सदर वाहने ताब्यात घेऊन निंभोरा पोलीस ठाण्यात आणण्यात आली आहेत. या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल भूषण सपकाळे व महेंद्र महाजन यांच्या फिर्यादीवरून चालक व मालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) २०२३ चे कलम ३०३(२), ४९ आणि महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (ML R C) कलम ४८(७), ४८(८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २. गोवंश तस्करी रोखली : त्याच रात्री पहाटे ४:०० वाजेच्या सुमारास विवरा खुर्द ते निंभोरा रोडवर संशयास्पद रित्या जाणारा 'टाटा छोटा हत्ती' (क्रमांक MH-05 BH-6493) चा सपोनि मीरा देशमुख यांनी पाठलाग करून तपासणी केली . यामध्ये कोणताही परवाना किंवा वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय दोन गायी आणि एक कालवड अशी एकूण १,३४,०००/- रुपये किमतीची गुरे निर्दयतेने बांधून नेली जात असल्याचे आढळले. या प्रकरणी चालक शेख मुजाहिद शेख असलम (रा. इमामवाडा, रावेर) याच्याविरुद्ध महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारित २०१५) आणि प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध करण्याच्या अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेली गुरे सुरक्षिततेसाठी बलवाडी येथील गोशाळेत पाठवण्यात आली आहेत. सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली पो.कॉ. राहुल केदारे, महेंद्र महाजन आणि भूषण सपकाळे, पोकॉ अमोल वाघ यांनी पार पाडली.

या गुन्ह्यांचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मीरा देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि अभय ढाकणे, पोहेकॉ बिजू जावरे व भगवान कोळी करत आहेत.

# थोडक्यात पण महत्वाचे

## भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन



खोडद (स. गांवकरी) : मुक्तादेवी चषक 2026 च्या भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुक्तादेवी कबड्डी संघ आणि गुंजाळवाडी च्या ग्रामस्थांनी दिली. शनिवार दिनांक 16-5-2026 रोजी सायंकाळी 4 वाजता पुणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने उत्तर पुणे जिल्ह्यातील सर्वात मोठा मुक्तादेवी चषक 2026 चे आयोजन गुंजाळवाडी येथील सर्व आजी-माजी खेळाडू व ग्रामस्थांनी आयोजन केले असून ही कबड्डी स्पर्धा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गुंजाळवाडी येथील मैदानावर होणार आहे या स्पर्धेसाठी प्रथम क्रमांकाचे बक्षीस म्हणून रोख 15000 रुपये नारायणगाव चे उपसरपंच व राजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बाबू पाटे यांनी ठेवले आहे. द्वितीय क्रमांकासाठी 11000 रुपयांचे बक्षीस प्रसिद्ध उद्योगपती प्रशांत दादा मच्छिंद्र डोंगरे यांनी तर तृतीय आणि चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी 7000 रुपयाचे बक्षीस गुंजाळवाडी चे तंटामुक्तीचे अध्यक्ष किरण दादा किसनराव सोलाट व द्राक्ष बागायतदार हेमंत भाऊ जाधव ,डॅनी भाऊ ढवळे ,निखिल वायकर ,गिरीश ढवळे यांनी ठेवले आहे. त्याचबरोबर बेस्ट रेडर साठी अजित भाऊ यांनी 1500 रुपये ,बेस्ट डिफेंडर साठी गोकुळ भाऊ तोडकर यांनी 1500 रुपये हे बक्षीस ठेवले आहे. मैदानाचा राजा यासाठी संतोष भाऊ वायकर, गिरीश भाऊ शिंदे यांनी बक्षीस म्हणून स्पोर्ट सायकल ठेवली आहे तरी या कबड्डी स्पर्धेसाठी कबड्डी संघांनी भाग घ्यावा व प्रेक्षकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी.असे आव्हान मुक्तादेवी कबड्डी संघ व गुंजाळवाडी ग्रामस्थांनी केली आहे.

## डायल ११२ ला खोटी माहिती देऊन पोलिसांची दिशाभूल; तरुण गोत्यात

अहिल्यानगर (स. गांवकरी) : शासकीय यंत्रणेचा विनाकारण वापर करून पोलिसांची दिशाभूल करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. कोठला परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीने आपल्या वहिनीने मारहाण केल्याची खोटी माहिती मडायल ११२फ या मदत क्रमांकावर दिली. मात्र, तपासात अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे समोर आल्याने तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र तुकाराम घुंगासे हे रात्रीच्या वेळी मडायल ११२फ च्या कर्तव्यावर होते. यादरम्यान मध्यरात्री पावणे एक वाजेच्या सुमारास आरोपी अमीर सलीम शेख (रा. कोठला, अहिल्यानगर) याने पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. आपल्या वहिनीने आपल्याला मारहाण केली असून तातडीने मदतीची गरज असल्याचे त्याने सांगितले. माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले. प्रत्यक्षात त्या ठिकाणी चौकशी केली असता, मारहाणीची कोणतीही घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले. केवळ पोलिसांना त्रास देण्याच्या उद्देशाने ही खोटी तक्रार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात व्यत्यय आणून खोटी माहिती दिल्याप्रकरणी रवींद्र घुंगासे यांच्या फिर्यादीवरून अमीर शेख याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अहिल्यानगर होरपळणार ; दोन दिवस उष्मालाटेचा यलो अलर्ट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : भारतीय हवामान खात्याद्वारे निर्गमित संदेशानुसार, १२ ते १४ मे दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात उष्मालाटेची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. यामुळे जिल्ह्यात उष्णतेचा यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या पार्श्वभूमीवर उष्माघाताचे मानव व पशू-प्राणी यांच्यावरील दुष्परिणाम टाळण्यासाठी नागरिकांनी योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन आरोग्य विभागासह जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून नगर जिल्ह्याचा पारा वधारतांना दिसत आहे. सकाळी ९ पासून उन्हाचा चटका वाढत असून दुपारी १२ ते सायंकाळी ५ पर्यंत उन्हाचा कडका जाणवत आहे. या काळात शहरासह ग्रामीण भागात शुकशुकाट जाणवत आहे. दुसरीकडे दररोज तापमानात वाढ होतांना दिसत आहे. त्यात आता भारतीय हवामान विभागाने नगरसह राज्यातील अनेक ठिकाणी उष्णतेचा यलो अर्लट जाहीर केला आहे. नगर जिल्ह्यात मंगळवार ते गुरूवार (दि.१४) पर्यंत उष्मालाटेचा यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. या लाटेतील दोन दिवस अजून शिल्लक असून यामुळे नागरिकांनी दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## वाहेदपूर गावातील स्वगणना १००% पूर्ण : रेणुकादास देवणीकर



अर्धापूर (स. गांवकरी) : तालूक्यातील वाहेदपूर या गावात स्वगणना पूर्ण करणारे पहिले गाव ठरले आहे.जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या मार्गदर्शनाखाली सूरु असलेल्या पहिल्या डिजीटल स्वगणना मोहिमेला वाहेदपूर गावातील नागरिकांनी उत्स्फूर्द प्रतिसाद दिला. शासन आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून झाले आहे. स्वगणना तालूक्यातील वाहेदपूर या गावात १००% करण्याचा संकल्प जनगणना चार्ज अधिकारी,तहसिलदार रेणूकादास देवणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वगणना करण्यासाठी पर्यवेक्षक सुनिल गोखले, प्रगणक विनोद भुसे, सरपंच साहेबराव कदम पोलीस पाटील भरत शेळके या सर्वांनी नियोजनबध्द पध्दतीने काम केले. तसेच या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. यामुळे अर्धापूर तालूक्यातील वाहेदपूर हे गाव आजघडीला स्वगणना १००% पूर्ण झाली. दरम्यान अर्धापूर तालूक्यातील इतर गावामधील नागरिकांनीही दिनांक १५ मे २०२६ पर्यंत स्वगणना प्रक्रिया पूर्ण करून डिजीटल मोहिमेत सक्रीय सहभाग नोंदवावा असे आवाहन जनतेला जनगणना अधिकारी, तहसिलदार अर्धापूर. रेणूकादास देवणीकर यांनी केले आहे.

## कडूबाई खरात यांच्या भीम गीतांने दुमदूमली बिलोली नगरी

बिलोली (स. गांवकरी) : बिलोली शहरात बुद्ध व भीम जयंतीनिमित्त दि. १२ मे सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांच्या "भीमानं माय सोन्यानं भरली ओटी", "तुम्ही खाता त्या भाकरीवर", "कुंकू लाविलं रमानं" आदी बहारदार गीताने बिलोली नगरी दुमदूमली आहे, या कार्यक्रमास अक्षरशः तालुक्यातून भीम सागरच उसळे होते. शहरातील आंबेडकर नगर जयंती मंडळाच्या वतीने बुद्ध, भीम जयंती निमित्ताने शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे महाराष्ट्राच्या प्रसिद्ध गायिका कडूबाई खरात यांच्या भीम गीतांच्या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे उद्घघाटन माजी नगराध्यक्षा मैथली कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले तर सुरेशदादा गायकवाड यांनी मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी.एल.एम. जाधव हे होते.यावेळी अनुप अंकुशकर उपाध्यक्ष न.प. बिलोली, नगरसेविका आम्रपाली पोवाडे,अनुपमा गायकवाड, नगरसेवक संदिप कटारे, राजू कुडके, शिवाजी गायकवाड, विना जाधव माजी न.प अध्यक्ष, विमलबाई जाधव, लताबाई जाधव, रेखाबाई पोवाडे यांची उपस्थिती होती. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आंबेडकर नगर भीम जयंती मंडळ तसेच पत्रकार तथा नगरसेवक प्रकाश पोवाडे, रत्नाकर जाधव, संजय जाधव,धम्मपाल जाधव, शिलरत्न जाधव, प्रदीप पोवाडे, हंसराज जाधव,विकास जाधव, रमेश पोवाडे, संघपाल जाधव, आशिष जाधव, प्रशांत जाधव यांनी परिश्रम घेतला आहे.

# महाराजस्व समाधान शिबिर तांभोळ मध्ये संपन्न

## तांभोळ जिल्हा परिषद शाळेचा शताब्दी महोत्सव उत्साहात



गणोरे : (स. गांवकरी)

> अनेकांची स्वप्न संघर्ष व संस्कार जपणारी ज्ञानाची पवित्र अशी प्राथमिक शाळा असते. - **शिक्षण तज्ञ भाऊसाहेब चासकर**

> समाज, शाळा आणि माणूस बदलण्याची शक्ती प्राथमिक शाळेत असते. समाजाला आश्रय देण्याचे काम शाळा करते. - **गटशिक्षणाधिकारी दोरगे**

विरगाव मंडलातील सर्वसामान्य नागरिकांच्या विविध महसूल आणि अडचणीचा प्रशासनाकडून निपटारा करण्यात आला. विरगाव महसूल मंडळातील नागरिकांसाठी तांभोळ ,( ता- अकोले ) येथे आयोजित केलेल्या समाधान शिबिर व तांभोळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा शताब्दी महोत्सव नुकताच उत्साहात संपन्न झाला. यावेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी सहभाग सहभाग नोंदवला व विविध समस्यांचे निराकरण करून घेतले. महसूल अधिकाऱ्यांनी नागरिकांना आवश्यक असलेल्या असलेली माहिती व मार्गदर्शन केले. यावेळी आमदार किरण लहमटे म्हणाले आपल्या परिसरात विविध डांबरी व सिमेंट रस्त्यांच्या सर्व भौतिक सुविधा वाढल्या परंतु सिमेंटच्या जंगलामुळे तापमानात वाढ होत आहे. यासाठी आपण सर्वांनी झाडे लावणे गरजेचे आहे. गावातून गुटखा बंद करा. शाळेत राजकारण बिलकुल आणू नका. सर्वसामान्य नागरिकांच्या दारी शासकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासन कायमच तत्पर असते. त्यामुळे परिसरात दाखले घेण्यासाठी गर्दी कमी असल्याचे दिसते. शिबिरात प्रलंबित फेरफार, सातबारा उताऱ्यातील चुका दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीसह सातबारा व आठ अ उताऱ्यांचे वाटप, उत्पन्नाचा, रहिवासी व जातीचे दाखले, नॉन क्रिमिलियर प्रमाणपत्र, अ कृषी परवानगी व त्याबाबत मार्गदर्शन, सनद प्रक्रिये बाबत मार्गदर्शन, सामाजिक अर्थसाह्य मध्ये संजय गांधी निराधार योजनेचे लाभार्थी व के वाय सी, विद्यार्थ्यांसाठी दाखल्याचे वाटप, तुकडे बंदी कायद्याचे उल्लंघन न करता घरांसाठी पट्टे वाटप, ई मोजणी अर्ज, अॅग्रोटेक व पीएम किसान नोंदणी आदी विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. भूसंपादन अ कृषी परवाना प्रकरणी कमी जास्त पत्रके गाव दप्तर अद्यावत करण्याची प्रक्रिया राबवण्यात आली. यावेळी यावेळी अक्षय आभाळे, महिपाल देशमुख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक कचरू कराळे गुरुजी, गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब दोरगे, प्रभारी तहसीलदार सचिन बाबळे, नायब तहसीलदार प्रमोद सावंत, सरपंच जयश्री मानें, माजी सभापती अंजना बोंबले,केशव बोडके, कुमकर, शिक्षण तज्ञ भाऊसाहेब चासकर, माने सर,विरगाव मंडळाधिकारी बाबासाहेब दातखीळे, गणोरे कामगार तलाठी अमोल गडाख, केशव शिरवळे, अजिंक्य यादव, बाबासाहेब वाकचौरे आदी मान्यवर उपस्थित होते.

# जबरदस्तीने शेतात खांब बसवीणाऱ्यावर कारवाई करा

तामसा : (स. गांवकरी)

तालुक्यातील मोज उमरी ज शिवारातील गट नंबर 286 मध्ये सोलार कंपनीशी कुठलाही करार नसताना जबरदस्तीने खांब रोहून शेतकऱ्याला धमकी देणाऱ्या सोलार कंपनीचे प्रमुख अमोल बाळासाहेब ईथा पे व त्यांच्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ता तथा शेतकरी वसंत उमला राठोड यांच्यासह नऊ ते दहा शेतकऱ्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी भोकर व तहसीलदार हदगाव यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली. त्यांनी आपल्या तक्रारीत नमूद केले की आम्ही सर्व शेतकरी तामसा तांडा ता. हादगाव येथील रहिवासी असून आमची जमीन गट नंबर 286 हे तलाठी सज्जा उमरी जहागीर शिवारात असून सदर जमीन ही वडिलोपार्जित आहे भाऊ विषय प्रमाणे वेगवेगळ्या नावाने करण्यात आली सदर जमिनीत आम्ही काबाडकष्ट करून आमच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह भागवतो पावसाळ्यापूर्वी शेतीची मशागतीचे काम करत असताना आमच्या शेतात रात्रीला येऊन सोलार पॉवर कंपनीचे मालक अमोल बाळासाहेब इथापे व त्यांचे कर्मचारी येऊन खांबे बसून सोलर बसण्याचे काम केले आहे . याबाबत त्यांनी सदर मालकाला विचारणा केली असता तुमच्यासोबत आमचा अथवा आमच्या गटातील एकाही शेतकऱ्याचा कुठलाही करार नसताना का खांबे बसवत आहे .असे विचारले असता शेतकऱ्याच्या अंगावर जाऊन शिवीगाळ केली व आम्हाला जेलमध्ये टाकण्याची धमकी दिली असे तक्रारीत नमूद केले त्यामुळे आमच्या हातातून सदर जमीन निघून जाईल की काय अशी आम्हास भीती वाटते सदर या प्रकरणात आम्ही दिनांक 8 5 2026 रोजी तहसीलदार हदगाव व पोलीस स्टेशन तामसा यांच्याकडे रीतसर तक्रार केली.

# बोरीवलीची रखडलेली पाणीपुरवठा योजना अखेर मार्गी



भिवंडी : (स. गांवकरी)

भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील बोरीवली गावासाठी जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेली नवीन पाणीपुरवठा योजना अखेर प्रत्यक्षात मार्गी लागली असून सध्या पाईपलाईन टाकण्याचे काम वेगाने सुरू आहे. अनेक वर्षांपासून रखडलेल्या या योजनेला सामाजिक कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गती मिळाल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

बोरीवली गावाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता, सन २००१ मध्ये उभारण्यात आलेली जुनी पाणीपुरवठा योजना अपुरी पडत होती. गावातील ८ ते ९ हजार नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा करण्यात अडचणी निर्माण होत होत्या. त्यामुळे जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे ९ कोटी रुपयांची नवीन पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली होती. या योजनेत नवीन उंच पाण्याची टाकी, फिल्टर प्लांट तसेच विस्तृत पाईपलाईन टाकण्याचा समावेश करण्यात आला आहे.

मात्र विविध तांत्रिक अडचणी आणि प्रशासकीय प्रक्रियांमुळे ही योजना गेली तीन ते चार वर्षे रखडून पडली होती. परिणामी नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत होता. ही समस्या लक्षात घेऊन बोरीवली येथील सामाजिक कार्यकर्ते अॅड. जियाद सोहराब गुजर यांनी विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला. संबंधित विभाग, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींशी समन्वय साधत त्यांनी योजनेचे काम सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून योजना आता प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या टप्प्यात पोहोचली आहे. सध्या पाच्छापूर येथील मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा जलवाहिनीपासून बोरीवली गावापर्यंत नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे. सरपंच तथा प्रशासक अन्वर अब्दुल पिंजारी आणि ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम सुरू असून ग्रामस्थांकडूनही समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर बोरीवली गावातील नागरिकांना नियमित, स्वच्छ आणि पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध होणार असल्याने अनेक वर्षांचा पाण्याचा प्रश्न सुटण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मात्र, योजनेचे उर्वरित काम वेळेत पूर्ण होण्यासाठी शासनाने उर्वरित निधी तातडीने उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या कामासाठी माजी पंचायत समिती सदस्य मुशीर नाचण, अकबर अब्दुल्ला खोत, दिलीप दिवे, मुसद्दीक मुल्ला, साद कासकर, अली हरे, मसिह नाचण, कैस बर्डी, मुजीब कासकर तसेच बोरीवली ग्रामपंचायत कमिटीने विशेष सहकार्य केले आहे.

# प्रभाग क्रमांक ५ मध्ये वानरांचा हैदोस ; उपाययोजनांची मागणी

## नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार यांचे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना निवेदन



किनवट : (स. गांवकरी)

किनवट शहरातील प्रभाग क्रमांक ५ परिसरात वानरांचा वाढता उपद्रव नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार यांनी दि. ११ मे रोजी किनवट येथील वनपरिक्षेत्र अधिकारी यांना निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

सदर निवेदनात प्रभाग क्रमांक ५ मध्ये गेल्या काही दिवसांपासून वानरांचा मोठ्या प्रमाणात वावर वाढल्याचे नमूद करण्यात आले आहे. वानरांकडून घरांमध्ये घुसून अन्नधान्य व इतर वस्तूंचे नुकसान केले जात असून नागरिकांना रस्त्यावरून ये-जा करताना त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः लहान मुलांवर व वृद्ध नागरिकांवर वानरांकडून हल्ल्याच्या घटना घडत असल्याने परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत.

शाळकरी मुलांना शाळेत ये-जा करताना मोठी भीती वाटत असून महिलांनाही घराबाहेर पडताना त्रास सहन करावा लागत असल्याची बाब निवेदनात नमूद करण्यात आली आहे. अनेक वेळा वानरांच्या टोळक्यांमुळे नागरिकांना घरांचे दरवाजे व खिडक्या बंद ठेवण्याची वेळ येत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

नगरसेवक चंद्रशेखर नेम्मानिवार यांनी वन विभागाने तात्काळ दखल घेऊन वानरांना सुरक्षितरीत्या पकडून अन्यत्र हलविण्याची कार्यवाही करावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षेसाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात अशी मागणी केली आहे. दरम्यान, प्रभाग क्रमांक ५ मधील नागरिकांनीही वन विभागाने त्वरित कारवाई करून वाढता वानरांचा उपद्रव रोखावा, अन्यथा भविष्यात गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही, अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# आधुनिक शेतीसाठी तंत्रज्ञानाची जोड आवश्यक – रमेश शिरसाट




किनवट : (स. गांवकरी)

किनवट येथे राशी सीड्सतर्फे आयोजित करण्यात आलेले “शेतकरी मित्र संमेलन” उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. आधुनिक शेती पद्धती, कापूस पिकाचे व्यवस्थापन तसेच बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत शेतकऱ्यांना यावेळी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. परिसरातील मोठ्या संख्येने शेतकरी या संमेलनाला उपस्थित होते. कार्यक्रमाला राशी सीड्सचे मराठवाडा प्रमुख अमोल सुभाष गरड, किनवट प्रमुख विशाल भुरेवार, समीर चौरे, राजू शेवाळे, केदार भट्टवार, केदार वट्टमवार, निखिल वट्टमवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे राशी सीड्सच्या प्रमुख कापूस वाण “सिक्स फायनान्स” विषयी देण्यात आलेली माहिती होय.

यावेळी तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना हवामान बदलाचा कापूस पिकावर होणारा परिणाम, योग्य बियाण्यांची निवड, संतुलित खत व्यवस्थापन, रोग व कीड नियंत्रण, सिंचन नियोजन तसेच उत्पादन वाढीसाठी आवश्यक आधुनिक तंत्रज्ञान याविषयी मार्गदर्शन केले. कमी खर्चात अधिक उत्पादन घेण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने शेती करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# जंतर-मंतर येथे एमआरपी कायद्यासाठी सत्याग्रह आंदोलन

## खासदार अमोल कोल्हे यांना अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे निवेदन



नवी दिल्ली / पुणे : (स. गांवकरी)

ग्राहकांच्या हितासाठी कमाल किरकोळ किंमत (एमआरपी) व्यवस्थेमध्ये मूलभूत सुधारणा व्हाव्यात, एमआरपी ठरवण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम कायदा करण्यात यावा, तसेच ग्राहकांना वस्तूंच्या किंमतीबाबत संपूर्ण पारदर्शक माहिती मिळावी या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने येत्या २५ मे रोजी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे भव्य सत्याग्रह आंदोलन आयोजित करण्यात आले आहे.

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे मध्य महाराष्ट्र प्रांत अध्यक्ष बाळासाहेब औटी यांच्या नेतृत्वाखाली ग्राहक पंचायतीच्या शिष्टमंडळाने खासदार Amol Kolhe यांची प्रत्यक्ष भेट घेऊन सदर विषय संसदेत मांडण्याची आग्रहाची विनंती केली. यावेळी बाळासाहेब औटी यांनी एमआरपी व्यवस्थेतील त्रुटी, ग्राहकांची होत असलेली आर्थिक लूट आणि आवश्यक कायदेशीर सुधारणा याबाबत खासदारांशी सविस्तर चर्चा केली.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, सध्याची एमआरपी व्यवस्था ग्राहक संरक्षणासाठी अस्तित्वात असली तरी प्रत्यक्षात ती अनेक ठिकाणी नफेखोरीचे साधन बनली आहे. ग्राहकांना वस्तूची खरी किंमत, उत्पादन खर्च, व्यापाऱ्यांचा नफा, वितरण खर्च किंवा एमआरपी योग्य आहे की नाही याची कोणतीही स्पष्ट माहिती मिळत नाही. परिणामी ग्राहकांकडून अतिरिक्त पैसे आकारले जात असून बाजार व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात असमतोल निर्माण होत आहे. ग्राहक पंचायतीने केंद्र सरकारकडे मागणी केली आहे की, भारत सरकारच्या वित्त मंत्रालय, वाणिज्य व उद्योग मंत्रालय आणि ग्राहक व्यवहार मंत्रालय यांच्या संयुक्त माध्यमातून एमआरपी निश्चित करण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्यात यावा. या कायद्यात वस्तूंच्या कमाल किरकोळ किंमतीसाठी वाजवी मर्यादा निश्चित करण्याची स्पष्ट तरतूद असावी.

तसेच एमआरपी संदर्भातील नियम निश्चित करणे, अंमलबजावणी करणे, तपासणी करणे आणि गैरप्रकारांवर कठोर कारवाई करण्यासाठी स्वतंत्र प्राधिकरण अथवा आयोग स्थापन करण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. विद्यमान कायद्यामध्ये आवश्यक सुधारणा करून उल्लंघन करणाऱ्या उत्पादक, वितरक किंवा व्यापाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाईची तरतूद करण्यात यावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

ग्राहकांना वस्तूंची खरी किंमत समजावी यासाठी उत्पादन खर्च, प्रथम विक्री किंमत, वितरण खर्च, व्यापारी नफा आणि अंतिम विक्री किंमत यांची स्पष्ट माहिती प्रत्येक उत्पादनावर नमूद करणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक करण्यात यावे, अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे.


याबाबत प्रसारमाध्यमांशी बोलताना बाळासाहेब औटी म्हणाले की, “एमआरपी ही ग्राहक संरक्षणाची प्रभावी यंत्रणा असणे अपेक्षित होते. मात्र आज अनेक कंपन्या आणि व्यापारी एमआरपीच्या माध्यमातून अवाजवी नफा कमावत आहेत.

# छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



शिवसेनेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने प्रोफेसर कॉलनीतील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, माजी शहरप्रमुख संभाजी कदम, गटनेते व नगरसेवक दत्ता कावरे, विक्रम राठोड, नगरसेवक संजय शेंडगे, नगरसेवक शाम नळकांडे, नगरसेवक नवनाथ कातोरे, नगरसेवक संदीप दातरंगे, नगरसेवक परेश लोखंडे, माजी महापौर व नगरसेविका सुरेखा कदम, सुरेश तिवारी,दिपक आडेप अभिजीत अष्टेकर,चेतन शिरसूल,प्रशांत कोकाटे,प्रताप गडाख,शाम सोनवणे,घनश्याम घोलप,स्वाती जाधव,शोभना चव्हाण, अरूण झेंडे, आबामहाराज गुंड आदी मान्यवर उपस्थित होते. संभाजी कदम म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली स्वराज्य व धर्मासाठी बलिदान देणाऱे महापुरूष छत्रपती संभाजी महाराज होते. जीवापेक्षाही धर्म प्रिय असणारे धर्मासाठी काहीपण या पध्दतीने असे अजय योध्दा १२० पैकी एक लढाईपैकी एक युध्द न हारलेले एकमेव छत्रपती संभाजी महाराज आहेत. संभाजी महाराजांची बुध्दीवान, कतृत्ववान व प्रशासक त्याचबरोबर एक धर्मनिष्ठ असे वेगवेगळे पैलू त्यांचे जीवनचरीत्र पाहीले की जाणवते छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराज प्रति हा महाराष्ट कायम ऋणी राहील. बाबुशेठ टायरवाले म्हणाले की, छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वंदन करतो संभाजी महाराजांचा इतिहास सर्वाना माहीत आहे तरूण पिढीने फक्त छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळयास हार अर्पण चालणार नाही धर्माच्या रक्षणासाठी प्रत्येक घरात संभाजी महाराज जन्माला आले पाहीजे महिलांनीपण मुलांना संभाजी महाराजाचे विचार सांगून संभाजी महाराज हे प्रत्येकाच्या हदयात निर्माण झाले पाहीजे.



नव निर्वाचित आमदार अक्षय कर्डिले यांचा विजया बद्दल ज्ञानेश योग आश्रमाचे संस्थापक पुंडलिक महाराज जंगले शास्त्री यांनी सत्कार करून आशीर्वाद दिले (फोटो महेश कांबळे)

## थोडक्यात बातम्या...

### मी सावित्रीची लेक १०वी व १२ वी च्या विद्यार्थिनींना पुरस्कार



अहिल्यानगर (स. गांवकरी) : मधील स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम, श्रमीकनगर, अहिल्यानगर.यांच्या वतीने दरवर्षी मी सावित्रीची लेक पुरस्कार १० वी, आणि १२ वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यर्थिनींना दिला जातो, दिवंगत विठ्ठल बुलबुले सर यांच्या प्रेरणेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे. तरी मार्च २०२६च्या परीक्षेत ज्या मुलींना १० वी, आणि १२ वी मधे ७० पासून पुढे गुण मीळवून उत्तीर्ण झालेल्या आहेत.त्यांना मी सावित्रीची लेक पुरस्कार पुरस्कार दिला जाणार आहे. त्यासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी मार्कशीट झेरॉक्स,आधार कार्ड झेरॉक्स,1 पासपोर्ट फोटो ( फोटोला स्टेपलर पीन मारू नये), मोबाईल नंबर हे पुरस्कारासाठी लागणारे कागदपत्रे खालील पत्यावर पाठवावीत. विविध क्षेत्रातील उल्लेखनीय करणाऱ्या मुली व महिला साठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहे यासाठी इच्छुकांनी प्रस्ताव पाठवावेत, सर्व देणगीदार यांच्या सहकार्यातून व सर्व सभासद यांच्या परिश्रमातून दरवर्षी हे पुरस्कार दिले जातात तरी अधिक माहिती साठी संपर्क स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम, अहिल्यानगर,श्रमीकनगर, सावेडी.नरेश कोटा मो 9689076471,वैभव कंदी 9096185945,विद्याताई एक्कलदेवी 7387761232, वंदनाताई दडगे 9511255656, राहुल दुलम 9595579795, सविताताई कोटा 9604146127 यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



### बाणेश्वर विदयालयाच्या गुणवंत विद्यार्थाचे आ. अक्षय कर्डीले हस्ते सत्कार

अहिल्यानगर (स. गांवकरी) : श्री बाणेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालय बु-हाणनगर विदयालयाचा एसएससी परीक्षेचा निकाल ९८.७४ टक्के लागला असुन एचएससी परीक्षेचा निकाल कला शाखा८८.७५, वाणिज्य शाखा८५.३३,विज्ञान शाखा९८.०७लागला असुन सर्व यशस्वी विदयार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले यांच्या हस्ते आज सत्कार करण्यात आला. यावेळी सुभाष कराळे,बोर्डे साहेब, संस्थेचे सर्व संचालक मंडळ,ग्रामस्थ, विदयालयाचे प्राचार्य श्री हापसे के.एम.,सीडी शिकारे,आर वाय झावरे, ग्रामस्थ,शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. एसएससी परीक्षा मार्च २०२६ प्रथम कु.कार्तिकी तुकाराम कर्डिले व कु.श्रेया भाऊसाहेब वारुळे,द्विितिय कु.गायत्री दत्तात्रय कर्डिले, तृतिय कु.श्रध्दा विजय कलमदाणे, १२ वी (एचएससी) परीक्षा मार्च २०२६ कला शाखा कु.वैष्णवी विनोद बु-हाडे,प्रथम कु.भाग्यश्री मोहन पटेकर, द्विितिय,कु.श्रध्दा अमोल गवारे तृतिय, वाणिज्य शाखा कु.दिपाली विष्णु डोके,वाणिज्य प्रथम,कु.प्रतिक्षा राजेंद्र वारुळे वाणिज्य द्विितिय,कु. अनुजा लक्ष्मण लष्करें वाणिज्य तृतिय, विज्ञान शाखा ,कु.तनुश्री प्रकाश शिदोरे विज्ञानप्रथम, कु.तन्वी ज्ञानेश्वर तापकिरे विज्ञानद्विितिय, कु.तनिष्क सोमनाथ बनसोडे विज्ञान तृतिय, कु.परमेश्वरी संग्राम जगताप विज्ञान चतुर्थ. संस्थेचे अध्यक्ष आमदार अक्षयदादा शिवाजीराव कर्डिले संस्थेचे सर्व संचालक मंडळ, ग्रामस्थ, विदयालयाचे शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### शासकीय ताफ्यात केली मोठी कपात

अहिल्यानगर (स. गांवकरी) : देशभरात इंधन बचत, पर्यावरण संरक्षण आणि अनावश्यक शासकीय खर्च कमी करण्याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या संदेशाची व्यापक चर्चा सुरू असतानाच अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रत्यक्ष कृतीतून त्याला प्रतिसाद दिला आहे. शासकीय ताफ्यातील अनावश्यक वाहनांची संख्या कमी करत त्यांनी आता आपल्या ताफ्यात केवळ दोनच वाहने ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पालकमंत्री विखे पाटील यांच्या या निर्णयामुळे राजकीय व प्रशासकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून, सामान्य जनतेतूनही या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. वाढत्या इंधन दरांच्या पार्श्वभूमीवर लोकप्रतिनिधींनी स्वतःपासून काटकसरीची सुरुवात करावी, असा संदेश या निर्णयातून दिला जात असल्याचे बोलले जात आहे. सध्या देशभरात इंधन वापर कमी करणे, पर्यावरण संवर्धन आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्यावर भर दिला जात आहे. अशा परिस्थितीत मोठे ताफे, अतिरिक्त वाहनांचा वापर आणि वाढता शासकीय खर्च यावर अनेकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. त्याच पार्श्वभूमीवर पालकमंत्री विखे पाटील यांनी घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे. विशेष म्हणजे, अनेकदा राजकीय पदाधिकाऱ्यांचे मोठे ताफे, त्यासाठी लागणारा इंधन खर्च आणि प्रशासनावर येणारा अतिरिक्त भार याबाबत सामान्य नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत असते. मात्र विखे पाटील यांनी स्वतःहून पुढाकार घेत ताफ्यात कपात केल्याने साधेपणा आणि जबाबदारीचे उदाहरण समोर आले आहे. पर्यावरणपूरक जीवनशैली, इंधन बचत आणि सार्वजनिक पैशांचा योग्य वापर या तिन्ही गोष्टींचा समतोल साधण्याचा प्रयत्न या निर्णयातून दिसून येत आहे. लोकप्रतिनिधींनी जनतेला फक्त संदेश देऊन चालत नाही, तर स्वतः कृतीतून आदर्श निर्माण करणेही गरजेचे आहे, अशी प्रतिक्रिया अनेक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# शिबिर अभियान टप्पा एक समाधान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

871 सातबारा व 591 आठ-अ उताऱ्यांचे वाटप, 12 जणांना संजय गांधी योजनेचा लाभ

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)



शासनाच्या छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्य समाधान शिबिर अभियान (टप्पा क्र. १) अंतर्गत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड तालुक्यातील धनेगाव येथे 14 मे रोजी उपविभागीय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाले.यावेळी लाभार्थ्यांना विविध शासकीय योजना लाभ प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

यावेळी विविध शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिल्यामुळे या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.या शिबिरामध्ये ग्रामविकास, आरोग्य, कृषी, भूमिअभिलेख (मोजणी) तसेच दुय्यम निबंधक विभागासह विविध शासकीय विभागांनी सहभाग घेतला. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती देत लाभार्थ्यां कडून अर्ज स्वीकारले.

तहसील कार्यालय, नांदेड यांच्या वतीने शिबिरात महसुली सेवांचे मोठ्या प्रमाणावर वितरण करण्यात आले,यामध्ये 871ऑनलाईन सातबारा उतारे व 591 आठ-अ उतारे नागरिकांना देण्यात आले. तसेच 12 पात्र लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ प्रदान करण्यात आला. याशिवाय फेरफार संदर्भातील अर्जही स्वीकारण्यात आले. शिबिरामध्ये उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, सातबारा, ८-अ उतारे, सातबारा दुरुस्ती, फेरफार नोंदी आदी महसुली सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या. तसेच आरोग्य विभाग, भूमिअभिलेख विभाग व पंचायत विभागानेही नागरिकांना विविध सेवा पुरवल्या.या कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी सचिन खल्लाळ यांनी मार्गदर्शन केले. तहसीलदार संजय वारकड यांनी प्रास्ताविकातून अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली.नायब तहसीलदार सुनील माचेवाड यांनी सूत्रसंचालन केले,तर स्वप्नील दिगलवार यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

पुरवठा निरीक्षक रवींद्र राठोड यांनी नागरिकांच्या समस्या ऐकून त्यांचे निराकरण केले.तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी उपस्थित राहून अभियानास सहकार्य केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी सय्यद मोसिन अहमद तसेच तलाठी दीपक सोनटक्के, राम मुंडे आणि संजय वानोळे यांनी विशेष योगदान दिले. तसेच मंडळ अधिकारी येलमट्टी संतोष आस्कुलकर व बडवणे ,तलाठी मनोज पे गिरी,जमदाडे व श्रीरामे यांनीही सहकार्य केले. शासनाच्या विविध सेवा व योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात काळ्याफिती आंदोलनास सुरुवात

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

**शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा शासनाविरोधात इशारा**

महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कृती समितीच्या राज्यव्यापी आंदोलनाच्या पहिल्या टप्प्याला आजपासून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ येथे सुरुवात करण्यात आली. विद्यापीठातील विविध कर्मचारी संघटनांनी काळ्याफिती लावून कामकाज करत शासनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न तात्काळ निकाली काढावेत, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. महाराष्ट्रातील राज्य सार्वजनिक विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अनेक मूलभूत व दीर्घकालीन प्रश्न अद्यापही प्रलंबित असल्याने राज्यभरातील कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्र राज्य विद्यापीठ व महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी कृती समितीच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करूनही शासन स्तरावर अपेक्षित निर्णय होत नसल्याने आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. प्रमुख मागण्यांमध्ये सातव्या वेतन आयोगानुसार १०, २० व ३० वर्षांनंतर मिळणारी आश्वासित प्रगती योजना लागू करणे, उर्वरित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करणे, २००५ पूर्वी जाहिरात प्रक्रिया पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे रजारोखीकरण अंतिम वेतनाच्या आधारे अदा करणे, रिक्त शिक्षकेतर पदभरतीस मंजुरी देणे, तसेच प्रयोगशाळा सहाय्यक व परिचरांना पूर्ववत लाभ सुरू करणे या मागण्यांचा समावेश आहे.

# गोदावरी पवार व वानोळे यांच्या महास्वराजय शिबीरात सत्कार

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



धनेगाव येथील महासवराज शिबीरात गुडेगाव शंभर टक्के स्वगणंणा पुर्ण केल्या बदल प्रगंणक गोदावरी पवार व तलाठी वानोळे यांच्या उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. नांदेड तहसीलदार कार्यालय अंतर्गत असलेल्या नांदेड दक्षिण तालुक्यातील गुंडेगाव व वाडीकरडेल या गावांमध्ये शंभर टक्के स्ववगणणा प्रकिया पुर्ण करण्यात आली असून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासनाचे नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी ही मोहीम राबविली असून गावांमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे. स्वगणनना प्रक्रियेदरम्यान गावातील नागरिकांची माहिती,कुटूंब नोंदी,घराची माहिती, संकलित करण्यात आली, प्रशासनाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गावात जाऊन माहिती संकलित केली. स्वगणनना पुर्ण झाल्यानंतर प्रत्येक कुंटूबाला स्वतंत्र स्वगणनना आयडी प्रदान करण्यात येत आहे या आयडीमुळे आगामी जणगणनना प्रक्रिया अधिक सुलभ व अचूक होण्यास मदत होणार आहे.शासनाचा विविध योजना प्रभावी नियोजन आणि लाभार्थ्यांची अचूक नोंदणी करण्यासाठी ही प्रक्रिया महत्वपूर्ण ठरणार आहे.ही मोहीम पारदर्शक व शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यासाठी तलाठी तथा प्रयवेक्षक वानोळे व प्रगणक गोदावरी पवार तसेच संबंधित विभागातील अधिकारी समन्वयाने काम करत स्वगणनना मोहीम यशस्वी केली आहे. गुंडेगाव येथील स्वगणनना पुर्ण केल्या बदल 14 मे रोजी नांदेड तहसील कार्यालय यांच्या वतीने वसरणी मंडळ अंतर्गत महास्वराज शिबिर प्रसंगी उपविभागीय अधिकारी डॉ सचिन खल्लाळ व नांदेड तहसीलदार संजय वारकड यांनी प्रगंणक गोदावरी पवार व तलाठी वानोळे यांच्या सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# स्व. सिद्धार्थ रविंद्र भंडारी यांच्या स्मरणार्थ १०८ रुग्णांना दृष्टी भेट

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



"असेल दृष्टी तर दिसेल सृष्टी"याप्रमाणे डोळा हा महत्त्वाचा अवयव आहे.न परवडणारा औषधोपचाराचा खर्च यामुळे ग्रामीण भागात अनेक रुग्णांना अंधत्व येत आहे.पैशाअभावी कोणताही रुग्ण मोतीबिंदू ऑपरेशन पासून वंचित राहू नये.यासाठी स्व.सिद्धार्थ रवींद्र भंडारी यांच्या स्मृतिदिनी आरोग्य शिबिर घेतले जाते.शिबिराच्या माध्यमातून भंडारी परीवाराच्यावतीने ४३२ रुग्णांचे मोफत शस्त्रक्रिया करण्यात आले आहेत. भंडारी परिवार हा आनंदऋषीजी हॉस्पिटल व जैन सोशल फेडरेशन यांच्याशी पूर्वीपासूनच जोडला गेलेला आहे. भंडारी परिवाराला जैन सोशल फेडरेशनने रुग्णसेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. आनंदऋषीजी नेत्रालयामार्फत गरजू रुग्णांना दृष्टी देण्याचे निस्वार्थपणे मानवसेवेचे कार्य कौतुकास्पद आहे. अंधांच्या जीवनात प्रकाशाची ज्योत पेटवून आनंदऋषीजी नेत्रालयाचे काम दीपस्तंभाप्रमाणे आहे.असे प्रतिपादन उद्योजक सचिन भंडारी यांनी केले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे स्व.सिद्धार्थ रविंद्र भंडारी यांच्या ५ व्या स्मृतिदिना निमित्त भंडारी परिवार व सुमन ग्रुपच्या वतीने आयोजित १०८ मोफत नेत्र शस्त्रक्रिया शिबिराचे उद्‌घाटन आयोजक उद्योजक रवींद्र भंडारी व सचिन भंडारी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. याप्रसंगी रमेशलाल छाजेड,संजय भंडारी, विजय भंडारी,संदीप भंडारी, विपुल भंडारी,गिरीश शिंगी, उमेश बोरा,हेमंत मुथ्था, नगरसेवक विपुल शेटीया, डॉ.लौकिक भंडारी, अतुल छाजेड, सौ.जिजाबाई भंडारी,बनारसी बाई भंडारी, सौ. साधना भंडारी,सौ.पुष्पा भंडारी, सौ.अनिता भंडारी, कुमारी श्वेता भंडारी,सौ.कांचन गावडे, सौ.उन्नती शिंगवी,जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारिया, डॉ. प्रकाश कांकरिया,सतीश लोढा, डॉ.आशिष भंडारी, माणकचंद कटारिया, सुभाष मुनोत,वसंत चोपडा, नेत्रालयाचे मेडिकल डायरेक्टर डॉ.अशोक महाडिक, प्रशासकीय प्रमुख आनंद छाजेड आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात डॉ.प्रकाश कांकरिया म्हणाले,रविंद्र भंडारी व सचिन भंडारी व भंडारी परिवार सामाजिक कार्यात पूर्वीपासूनच अग्रेसर आहे. समाजातील दानशूर व्यक्तींमुळेच आनंदऋषीजी हॉस्पिटलचे मोठे कार्य उभे राहिले आहे.स्व.सिद्धार्थ रविंद्र भंडारी यांच्या स्मरणार्थ १०८ रुग्णांची मोफत नेत्राची शास्त्रक्रिया करण्यात आली आहे.स्मृतिदिन कसा साजरा करावा हे भंडारी परिवाराने सामाजिक कार्यातून दाखवून दिले आहे.गेल्या चार वर्षापासून भंडारी परिवार हॉस्पिटलच्या सेवा कार्यात जोडला गेला आहे. स्व.सिद्धार्थ भंडारी यांच्या स्मृती,आठवणी भंडारी परिवाराने जपल्या आहेत. आनंदऋषीजी नेत्रालयाने आतापर्यंत एक लाखाहून अधिक मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे केले आहेत. मराठवाडा,संभाजीनगर, बीड येथून नेत्र तपासणी करून मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जात आहेत. नेत्रालयाने तारकपूर येथेही एक सेंटर सुरू केले आहे.नेत्रालयाच्या उत्कृष्ट कार्यामुळे रुग्णांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.

नेत्रालयाचे प्रशासकीय प्रमुख डॉ. आनंद छाजेड म्हणाले, आत्तापर्यंत आनंदऋषीजी नेत्रालयामध्ये १लाख २०हजार रुग्णांची शस्त्रक्रिया यशस्वी झाली आहे.तसेच २० विजन सेंटर मार्फत शेजारच्या सहा जिल्ह्यांमध्ये नेत्रालयाचे काम सुरू आहे.ग्रामीण भागातील रुग्णांना ने आण करण्यासाठी बसची सुविधा आहे.तसेच ऑपरेशन केलेल्या रुग्णांना औषधे,लेन्स व काळा चष्मा मोफत या सर्व सुविधा उपलब्ध करून देतात.पैशाअभावी कोणताही रुग्ण वंचित राहू नये.यासाठी आनंदऋषीजी हॉस्पिटल कार्य करीत आहे.

# डॉ. विखे पाटील अभियांत्रिकीत “टेक फेस्ट २०२६” उत्साहात

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी येथील माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत आयोजित टेक फेस्ट 2026 हा दोन दिवसीय तांत्रिक महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. माहिती तंत्रज्ञान अभियांत्रिकी विद्यार्थी संघटना (ITESA) यांच्या वतीने आयोजित या महोत्सवाची थीम “अवेकिंग द इंटेलिजन्स विदिन द मशीन ” अशी होती.

या महोत्सवात विविध शाखांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) व आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्यांचे प्रदर्शन करण्याची उत्तम संधी मिळाली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे व्ही. आर.डी.इ.चे सेवानिवृत्त शास्त्रज्ञ श्री. आर.पी.वायकर हे उपस्थित होते. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.असे मार्गदर्शन करताना आपल्या भाषणातून सर्व विद्यार्थ्यांचे मन भरून कौतुक केले.

पहिल्या दिवशी बौद्धिक व तांत्रिक कौशल्यांची कसोटी पाहणाऱ्या स्पर्धा घेण्यात आल्या.या मध्ये ज्ञानवर्धक प्रश्नमंजुषा स्पर्धा, रिवर्स कोडिंग पोस्टर सादरीकरण, वक्तृत्व व विचारमंथन स्पर्धा, जपानी भाषा व संस्कृतीवरील प्रश्नमंजुषा, जपानी प्रोजेक्ट.

दुसऱ्या दिवशी सर्जनशीलता व मनोरंजनाला प्राधान्य देण्यात आले.यामध्ये प्रोग्रामिंग स्पर्धा, विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांचे सादरीकरण,पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा, गेम झोन यांसारख्या गेम्स घेण्यात आल्या. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी कोडिंग, सादरीकरण, वक्तृत्व व सर्जनशीलतेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. आकर्षक बक्षिसांमुळे स्पर्धांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख डॉ . दीपक विधाते , शिक्षक समन्वयक डॉ.प्रतिभा गायके, प्रा.प्राजक्ता डोलारे, प्रा. गणेश डहाणे, प्रा.आरती बावणे, प्रा. अविनाश पुंड, प्रा.पूजा वैकर तसेच विद्यार्थी समन्वयक सुरज हुंडाडे, ओंकार जोशी, पूजा केवट, श्रद्धा तांगडे, सोहम शिंदे, पूजा कोतकर, गायत्री लामखडे, ऋषिकेश कड, अथर्व हारदे, वरद कुलकर्णी तसेच सर्व प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले.फाउंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचे संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ.पी. एम. गायकवाड, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील, तसेच संस्थेचे चेअरमन व राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक केले. टेक फेस्ट 2026 हा महोत्सव विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरला असून, तांत्रिक क्षेत्रात नवचैतन्य निर्माण करणारा ठरला. अशा भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

## थोडक्यात पण महत्वाचे



### कोगदे गावात 'गवत्या'तून आदिवासी इतिहासाचे जतन

पालघर (स. गांवकरी) : आधुनिकतेच्या वाढत्या प्रभावातही आदिवासी समाजाने आपल्या पारंपरिक संस्कृती व चालीरीतींचे जतन करण्याची परंपरा कायम राखली असून जव्हार तालुक्यातील कोगदे गावात विवाह सोहळ्यात मध्य रात्री काढल्या जाणाऱ्या 'गवत्या'च्या माध्यमातून आदिवासी इतिहास आणि सांस्कृतिक वारसा जपला जात आहे. आदिवासी विवाह परंपरेतील 'गवत्या' हा केवळ एक विधी नसून पूर्वजांपासून चालत आलेल्या संस्कृती, सामाजिक परंपरा आणि इतिहासाचे जिवंत प्रतीक मानले जाते. वधू-वरांच्या कुटुंबीयांसह ग्रामस्थांच्या सहभागातून पारंपरिक पद्धतीने हा विधी पार पडतो. संबळ, तारपा, ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वेशभूषा आणि ग्रामस्थांचा सामूहिक सहभाग यामुळे संपूर्ण वातावरण सांस्कृतिक रंगांनी नटलेले दिसून येते. 'गवत्या'मधून आदिवासी समाजाचे निसर्गाशी असलेले नाते, पूर्वजांच्या स्मृती आणि सामाजिक ऐक्य अधोरेखित होत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. ज्येष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणाऱ्या या परंपरेतून नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची आणि इतिहासाची ओळख करून दिली जाते. बदलत्या जीवनशैलीमुळे अनेक पारंपरिक चालीरिती लोप पावत असताना आदिवासी भागात मात्र अशा परंपरा आजही जपल्या जात आहेत. त्यामुळे आदिवासी संस्कृतीची वेगळी ओळख आणि ऐतिहासिक वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य 'गवत्या'सारख्या परंपरांमधून होत असल्याचे चित्र कोगदे गावात पाहायला मिळत आहे.

### शेवगाव तालुक्यातील युवकावर नगरमध्ये चाकूने हल्ला

अहिल्यानगर (स. गांवकरी) : कॉलेजमध्ये झालेल्या किरकोळ भांडणाचे रूपांतर टोकाच्या वादात होऊन एका १९ वर्षीय विद्यार्थ्यावर चाकूने हल्ला करण्यात आला. ही घटना गुलमोहर रस्त्यावरील आनंद शाळेसमोर सोमवारी (११ मे) सायंकाळी घडली. अभिषेक सोमनाथ लांडगे (वय १९ रा. गुलमोहर रस्ता, अहिल्यानगर, मुळ रा. दहिगाव-ने, ता. शेवगाव) असे जखमी युवकाचे नाव आहे. त्याच्यावर येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचार सुरू असून त्याने दिलेल्या जबाबावरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अविनाश विश्वास जायभाय (रा. दूध सागर सोसायटी, केडगाव) व त्याच्यासोबतच्या तीन साथीदारांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी अभिषेक लांडगे हा अहिल्यानगरमधील एका महाविद्यालयात शिक्षण घेतो. त्याचा मित्र संतोष महाडिक आणि विशाल नागरगोजे यांच्यात कॉलेजमध्ये भांडण झाले होते. याच वादाचा राग मनात धरून अविनाश जायभाय याने संतोषला फोनवरून शिवीगाळ केली आणि चर्चेसाठी बोलावले. सायंकाळी साडेसात वाजेच्या सुमारास अभिषेक, संतोष आणि रोहन लांडगे हे गुलमोहर रस्त्यावरील नाथकृपा इंटरप्राईजेस कार्यालयाबाहेर आले असता, तिथे अविनाश जायभाय आणि त्याच्यासोबत असलेल्या इतर तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले. यावेळी झालेल्या झटापटीत अविनाशने अभिषेकवर चाकूने वार केले. यात तो जखमी झाला. संशयित आरोपी अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले. जखमी अभिषेकवर जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली असून अधिक तपास महिला पोलीस अंमलदार प्रियंका राऊत करीत आहेत.

### ठाण्यातील तलावांची महापौरांनी अधिकाऱ्यांसमेवत केली पाहणी



ठाणे (स. गांवकरी) : तलावांचे शहर म्हणून ओळख असलेल्या ठाण्यातील तलावांचे संवर्धन आणि सुशोभीकरणासाठी राज्य सरोवर संवर्धन या योजनेच्या माध्यमातून तलावांच्या सुशोभिकरणाची कामे करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी पदाधिकारी आणि अधिकाऱ्यांसमवेत तलावांचा दौरा केला. या दौऱ्यादरम्यान तलाव परिसरात आवश्यक असलेली कामे करण्यासंदर्भात महापौरांनी प्रशासनास सूचना दिल्या. सदर दौऱ्याची सुरूवात कचराळी तलाव येथून करण्यात आली. त्यानंतर सिध्देश्वर तलाव, मखमली तलाव, ब्रह्माळा तलाव, घोसाळे तलाव, मदार्डे तलाव, गोकुळनगर तलाव आदींची पाहणी करण्यात आली. या वेळी उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे यांच्यासह त्या त्या प्रभागातील स्थानिक नगरसेवक राजेश मोरे, माधुरी मेटांगे, काजल गुणीजन, नंदा पाटील, दिपक जाधव, शुचिता पाटणकर, मुख्य पर्यावरण अधिकारी मनिषा प्रधान, उपनगरअभियंता विकास ढोले, शुभांगी केसवानी, कार्यकारी अभियंता मोहन कलाल, स्वच्छता निरीक्षक आदी उपस्थित होते.

### कै. सदाशिव किसनराव जाधव यांचे दुःखद निधन



श्रीगोंदा तालुका (स. गांवकरी) : गार येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा सहकार क्षेत्रातील अनुभवी व्यक्तिमत्त्व कै. सदाशिव किसनराव जाधव (वय ७७) यांचे शुक्रवार दि. ०९ मे २०२६ रोजी पहाटे ४.३० वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, तीन भाऊ, दोन बहिणी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने गार पंचक्रोशीसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कै. जाधव यांनी सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्यात शेतकी व अकाउंट विभागात तब्बल ३८ वर्षे प्रामाणिक सेवा बजावली. आपल्या कर्तव्यदक्ष आणि मनमिळावू स्वभावामुळे त्यांनी सहकारी क्षेत्रात विशेष ओळख निर्माण केली होती. सामाजिक व राजकीय क्षेत्रातही त्यांचे मोठे योगदान राहिले. गार ग्रामपंचायतीचे त्यांनी पाच वर्षे सरपंच म्हणून काम पाहिले. तसेच गार विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन म्हणूनही त्यांनी पाच वर्षे जबाबदारी सांभाळली. त्यांच्या कार्यकाळात गावातील अनेक विकासकामे व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. त्यांच्या निधनाने गार गावाने एक कर्तव्यनिष्ठ, सामाजिक भान जपणारे आणि सहकार क्षेत्रातील अनुभवी नेतृत्व गमावल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आगामी काळात उग्र रूप धारण करू

## राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव : कांद्याच्या प्रश्नावर शेतकऱ्यांचा नगर कल्याण महामार्गावर एल्गार

### महामार्ग अडवल्यामुळे गाड्यांच्या लांबच लांब रांगा



पारनेर : (स. गांवकरी)

शेतकरी अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जगत आहे. शेतात रात्रंदिवस घाम गाळून पिकवलेल्या कांद्याला कवडीमोल भाव मिळत असल्यामुळे शेतकऱ्याचा उत्पादन खर्चही निघत नाहीये. मायबाप सरकारने शेतकऱ्यांच्या या छळाकडे डोळेझाक करू नये. कांद्याला तात्काळ योग्य हमीभाव मिळालाच पाहिजे आणि जाचक निर्यातबंदी पूर्णपणे उठवली पाहिजे. जर सरकारने शेतकऱ्यांच्या या मागण्यांकडे वेळीच गांभीर्याने लक्ष दिले नाही आणि ठोस निर्णय घेतला नाही, तर आगामी काळात हे आंदोलन उग्र रूप धारण करेल. शेतकरी आता आपल्या हक्कासाठी मागे हटणार नाही असे आंदोलन स्थळी राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव यांनी आक्रमक मत व्यक्त केले.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आज, १५ मे रोजी नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गावर टाकळी ढोकेश्वर येथे खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रस्ता रोको आंदोलन एक तासभर करण्यात आले. नांदूर पठारचे सरपंच रवींद्र राजदेव यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या उग्र आंदोलनामुळे महामार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी पूर्णपणे ठप्प झाली होती. आंदोलनात पारनेर, नगर आणि परिसरातील शेकडो शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पारनेर पोलीस स्टेशनच्या वतीने टाकळी ढोकेश्वर चौकातील रस्ता रोको आंदोलन स्थळावर मोठा पोलीस फौज फाटा बोलवण्यात आला होता व सुरक्षेच्या दृष्टीने खबरदारी घेण्यात आली. सध्या बाजारात कांद्याला मिळणारा बाजारभाव अत्यंत कमी असल्याने शेतकऱ्यांचा साधा उत्पादन खर्चही निघत नाहीये. यामुळे शेतकरी पुरता आर्थिक संकटात सापडला आहे. कांद्याला योग्य हमीभाव मिळावा, निर्यातबंदी पूर्णपणे हटवण्यात यावी, स्वामिनाथन आयोगाच्या शिफारसींची तातडीने अंमलबजावणी व्हावी, शेतकऱ्यांची थकीत वीज बिले माफ करण्यात यावीत आणि पीकविम्याचा हक्काचा लाभ मिळावा, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी महामार्ग अडवून धरला. या आंदोलनाला विविध राजकीय आणि सामाजिक संघटनांनी जाहीर पाठिंबा दिला. आंदोलन स्थळी राष्ट्रवादीचे नेते दीपक लंके, राष्ट्रवादीचे नेते रवींद्र राजदेव, राष्ट्रवादीचे जिल्हा प्रवक्ते मोहन रोकडे, महिला नेत्या सोनिया राजदेव, निलेश लंके प्रतिष्ठानचे तालुकाध्यक्ष सतीश भालेकर, सरपंच प्रकाश गाजरे, उपसरपंच रामभाऊ तराळ, ज्येष्ठ नेते शशिकांत आंधळे, शहराध्यक्ष संदीप मते, लखन ठाणगे जालिंद लंके, विक्रम काळे, विश्वास शेटे, सरपंच शिवाजी निमसे, पोपट गुंड, संदीप ठाणगे, सरपंच अभिजित झावरे, प्रकाश राजदेव, भाऊसाहेब चौधरी, भानुदास आग्रे, बाळासाहेब चिकणे, सुनील मुळे, संतोष चिकणे, साहेबराव चिकणे, शिवराम चिकणे, रामभाऊ थोरात, सरपंच बापू ठुबे, आयुब हवलदार, गंगाराम चिकणे, रामदास साळवे, बापू नरड, पोपट नरड, राजेंद्र शेरकर, विकास दगाबाज, जयवंत वाळुंज यांच्यासह शेकडो शेतकरी बांधव आणि कार्यकर्ते या आंदोलनात हिरीरीने सहभागी झाले होते.

या आंदोलनाचे नेतृत्व करणारे पारनेर तालुक्यातील सक्रिय राजकीय व सामाजिक नेते, सरपंच रवींद्र राजदेव यांनी यापूर्वीही रस्ते, पाणी आणि शेतीशी संबंधित अनेक प्रश्न यशस्वीपणे मार्गी लावले आहेत. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. प्रशासनाकडून आंदोलनकर्त्यांशी चर्चेचे अनेक प्रयत्न झाले; परंतु मागण्यांवर ठोस निर्णय होईपर्यंत आंदोलनावरून मागे न हटण्याचा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला.

## विद्यार्थ्यांसाठी मोफत पूर्वतयारी प्रशिक्षण

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राज्यातील इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती तसेच विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीच्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने महाज्योतीमार्फत जेईई, नीट आणि एमएचटी-सीईटी २०२६-२८ बॅचसाठी मोफत ऑनलाइन पूर्वतयारी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. पात्र विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे यांनी केले आहे. महाज्योतीमार्फत विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने दर्जेदार प्रशिक्षण दिले जाणार असून टॅबही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या प्रशिक्षणासाठी विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. संबंधित विद्यार्थी इतर मागास वर्ग, विमुक्त जाती-भटक्या जमाती किंवा विशेष मागास प्रवर्गातील असावा. विद्यार्थी इयत्ता दहावीची परीक्षा उत्तीर्ण झालेला असावा. तसेच विद्यार्थ्याने विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेला असावा.

विद्यार्थी हा नॉन क्रिमिलेअर उत्पन्न गटातील असावा. विद्यार्थ्यांची निवड इयत्ता दहावीतील गुणांची टक्केवारी, सामाजिक प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणानुसार करण्यात येणार आहे. अर्ज करण्यासाठी आधार कार्ड, रहिवासी दाखला, जातीचे प्रमाणपत्र, वैध नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, इयत्ता दहावीची गुणपत्रिका, दिव्यांग असल्यास संबंधित प्रमाणपत्र तसेच अनाथ असल्यास त्याबाबतचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांनी महाज्योतीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत.

## ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने जनजागृती अभियान

ओतूर : (स. गांवकरी)




जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलीस स्टेशनच्या वतीने रोडवरील अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष जनजागृती अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी दिली.

पुणे ग्रामीणचे पोलीस अधिक्षक संदिपसिंह गिल्ल यांच्या सुचनेनुसार तसेच अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे ग्रामीण घटकातील अपघाताचे प्रमाण १५ टक्के ते २० टक्के कमी करण्यासाठी रस्ता सुरक्षा व वाहन चालकांमध्ये जनजागृती अभियान सुरू केले आहे.

त्यानुसार ओतूर पोलीस स्टेशन हद्दीत कल्याण- अहिल्यानगर महामार्ग, ओतूर शहर व परिसरात वाढते रस्ते अपघात लक्षात घेता नागरिकांमध्ये वाहतूक नियमांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष जनजागृती अभियान राबविण्यात येत असून अभियानांतर्गत महामार्ग, मुख्य चौक, शाळा परिसर तसेच गर्दीच्या ठिकाणी वाहन चालकांना वाहतूक नियमांचे सूचना फलक लावून त्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पोलीस अधिकाऱ्यांनी दुचाकी चालकांना हेल्मेट वापरणे, चारचाकी चालकांनी सीट बेल्ट लावणे, मोबाईलवर बोलत वाहन चालवू नये तसेच वेगमर्यादेचे पालन करावे, अशा सूचना दिल्या. यावेळी नागरिकांना माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले तसेच वाहतूक नियमांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. या अभियानात पोलीस कर्मचारी, वाहतूक विभागाचे अधिकारी, सामाजिक संस्था सहभागी झाल्या होत्या. "सुरक्षित वाहतूक, सुरक्षित जीवन" हा संदेश देत नागरिकांनीही या उपक्रमाला सकारात्मक प्रतिसाद दिला. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे यांनी सांगितले की, रस्ते अपघातांची संख्या कमी करण्यासाठी अशा प्रकारचे जनजागृती उपक्रम पुढेही नियमितपणे राबविण्यात येणार असून नागरिकांनी सहकार्य करावे असे ही आवाहन त्यांनी केले.

## स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ उभारली जाणार 'स्व. अरुणकाका साहित्य नगरी'

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेले १७ वे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन येत्या २३ व २४ मे रोजी जाधव लॉन्स, नगर-कल्याण रोड, अहिल्यानगर येथे उत्साहात पार पडणार असून, यंदाच्या संमेलनस्थळास पहिल्या शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटक तथा माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ 'स्व. अरुणकाका साहित्य नगरी' असे नाव देण्यात येणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष तथा अहिल्यानगर महानगरपालिकेचे नगरसेवक सुरेश बनसोडे यांनी दिली.

या संमेलनाच्या पूर्वतयारीसंदर्भात नुकतीच महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी स्व. अरुणकाका जगताप यांच्या साहित्यप्रेमी व्यक्तिमत्त्वाच्या आठवणींना उजाळा देत हा निर्णय एकमताने घेतला. शब्दगंध साहित्य संमेलनाच्या पहिल्या पर्वात स्व. अरुणकाका जगताप यांनी विशेष आत्मीयतेने सहभाग घेतला होता. कविवर्य बाबासाहेब सौदागर यांच्या अध्यक्षतेखाली व डॉ. सुधाताई कांकरिया यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या पहिल्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचे उद्घाटन त्यांनी केले होते.

चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या समवेत दिवसभर साहित्यिकांमध्ये रमून त्यांनी साहित्यिक चळवळीबद्दल असलेले प्रेम व्यक्त केले होते.

त्यानंतरही शब्दगंध साहित्य संमेलनाबद्दल त्यांना विशेष आकर्षण होते. संमेलनाची माहिती ते सातत्याने जाणून घेत असत. पंधरावे राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलन आमदार संग्रामभैय्या जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. गुणे शास्त्री आयुर्वेद महाविद्यालयाच्या प्रांगणात भव्य स्वरूपात पार पडले होते. त्यावेळीही स्व. अरुणकाका यांनी साहित्यिकांशी मनमोकळा संवाद साधला होता. याच साहित्यप्रेमी आठवणी जपण्यासाठी आणि त्यांच्या कार्याला अभिवादन करण्याच्या उद्देशाने यंदाच्या संमेलनस्थळास 'स्व. अरुणकाका साहित्य नगरी' हे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

या बैठकीस संस्थापक सचिव सुनील गोसावी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, उपाध्यक्ष डॉ. जी. पी. ढाकणे, राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे, खजिनदार भगवान राऊत, भारत गाडेकर, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, प्रा. डॉ. अनिल गर्जे, शर्मिला गोसावी, स्वाती ठुबे, बबनराव गिरी, सुभाष सोनवणे, राजेंद्र पवार, मकरंद घोडके, प्रशांत सूर्यवंशी, हर्षल आगळे, राजेंद्र चोभे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, प्रा. डॉ. संदीप सांगळे हे यंदाच्या संमेलनाचे संमेलनाध्यक्ष असून महाराष्ट्रभरातील नामवंत तसेच नवोदित साहित्यिकांचा सहभाग या संमेलनात अपेक्षित असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## अभिनव खराबीचे सीबीएसई परीक्षेत मोठी झेप

पारनेर : (स. गांवकरी)



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (CBSE) २०२६ च्या इयत्ता १२ वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला असून, उद्योजक अशोक खराबी यांचे चिरंजीव अभिनव अशोक खराबी याने घवघवीत यश संपादन केले आहे. अभिनवने गणितात १०० पैकी १०० गुण मिळवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. अभिनव खराबी याने राजस्थान मधील कोटा येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयामध्ये शिक्षण घेतले आहे. अभिनवने केवळ गणितातच नव्हे, तर भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि शारीरिक शिक्षण या विषयांतही प्रत्येकी ९५ गुण मिळवून आपल्या गुणवत्तेची छाप पाडली आहे. त्याने एकूण परीक्षेत 'A1' ग्रेडसह यश मिळवत आपल्या कुटुंबाचा आणि तालुक्याचा गौरव वाढवला आहे. अभिनवच्या या यशाबद्दल जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील, सरपंच प्रकाश राठोड, शिवसेना तालुकाप्रमुख अरुणराव ठाणगे आणि राष्ट्रवादीचे प्रवक्ते मोहन रोकडे यांनी त्याचे विशेष कौतुक केले आहे. तसेच युवा नेते अमोल उगले, युवा उद्योजक संतोष शेलार, जालिंदर वाबळे, शिवाजी ठाणगे, डॉ. नितीन रांधवन, कॉन्ट्रॅक्टर संतोष दाते, बापू नरड, माऊली ठुबे आणि संदीप खराबी अशोक निमसे, बाळासाहेब दातीर, भाऊ रांधवन, कैलास नर्हे आणि पत्रकार गणेश जगदाळे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनवच्या या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले आहे. अभिनवने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील आणि शिक्षकांना दिले असून, त्याच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तरुणांनो, नोकरीच्या नादी न लागता स्वतःचा व्यवसाय करा

### वासुंदे येथील कीर्तनातून निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे आवाहन

पारनेर : (स. गांवकरी)



आजच्या धावपळीच्या युगात तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा व्यवसाय करून स्वावलंबी बनावे. कष्टाने मिळवलेला पैसाच जीवनात चिरकाळ टिकतो, असे परखड मत प्रसिद्ध समाज प्रबोधनकार ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांनी व्यक्त केले.

वासुंदे येथील खडक वस्ती येथे उद्योजक पप्पू दाते व गणेश दाते या बंधूंनी आपल्या घरगुती कार्यक्रमानिमित्त इंदुरीकर महाराजांच्या कीर्तन सेवेचे आयोजन केले होते. शनिवार, दिनांक ९ मे २०२६ रोजी झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित अफाट जनसमुदायाला मार्गदर्शन करताना महाराज बोलत होते. कीर्तनाद्वारे समाजातील वास्तव मांडताना इंदुरीकर महाराज म्हणाले की, जीवनात चांगल्या मित्रांची संगत करणे अत्यंत आवश्यक आहे. शरीर संपदा हीच खरी संपत्ती असून ती कमावण्यासाठी आणि टिकवण्यासाठी तरुणांनी प्रयत्न केले पाहिजेत. आजची तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात असल्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आणि तरुणांनी कोणत्याही परिस्थितीत व्यसनांपासून दूर राहावे, असे कळकळीचे आवाहन केले.

महाराजांनी पालकांना मोलाचा सल्ला दिला की, प्रत्येकाने आपल्या घरात संस्कारी मुले तयार करावीत. केवळ भौतिक प्रगती महत्त्वाची नसून, मुलांवर होणारे संस्कार हेच कुटुंबाचे आणि राष्ट्राचे भविष्य उज्ज्वल करतात. मानवी जीवनाचे सार्थक करण्यासाठी 'धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष' या चार पुरुषार्थांचा अंगीकार प्रत्येकाने केला पाहिजे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करतानाच भगवंताची सेवा करून आपले जीवन मंगलमय बनवण्याचा मार्ग त्यांनी भाविकांना दाखवला. दाते परिवाराने आपल्या घरगुती कार्यक्रमात अनावश्यक डामडौल करण्याऐवजी समाज प्रबोधनपर कीर्तनाचे आयोजन करून समाजासमोर एक आदर्श ठेवला आहे. दाते परिवार हा डॉ. नारायण महाराज जाधव यांना आपला आदर्श मानतो, तर निवृत्ती महाराज इंदुरीकर यांना आपला मार्गदर्शक मानून वाटचाल करत आहे. दाते परिवाराने या कार्यक्रमाच्या माध्यमातून सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला. या कीर्तन सोहळ्यासाठी टाकळी ढोकेश्वर, वासुंदे, वडगाव सावताळ, खडकवाडी आणि परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. दाते परिवाराने आयोजित केलेल्या या 'भक्ती आणि प्रबोधन' सोहळ्याचे परिसरात मोठे कौतुक होत आहे.